# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२५

------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण १८, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

-----------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ४७**

-----------------------------------

### फलटण (जि.सातारा) येथील शासकीय रुग्णालयातील महिला डॉक्टरने केलेली आत्महत्या

**(१) * १५५९२ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फलटण (जि.सातारा) येथील शासकीय रुग्णालयातील महिला डॉक्टरने एका हॉटेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिला डॉक्टरने आत्महत्येपूर्वी स्वत:च्या हातावर पोलीस निरीक्षक, श्री.गोपाळ बदने यांनी केलेला अत्याचार तसेच श्री.प्रशांत बनकर यांनी केलेला शारिरीक व मानसिक छळ हे कारण लिहून ठेवले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शवविच्छेदनाचे चुकीचे अहवाल देण्यासाठी लोकप्रतिनिधी व त्यांचे दोन स्वीय सहायक तसेच पोलिसांकडून सदर महिला डॉक्टरवर दबाव आणला होता असा आरोप नातेवाईकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी वरिष्ठ महिला आयपीएस अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील SIT नियुक्त करून चौकशी करण्याबाबत तसेच मयत वैद्यकीय अधिकारी यांच्या बंधूना अनुकंपा तत्त्वावर नोकरीत सामावून घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २५ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने SIT नियुक्त करुन दोषींवर कारवाई करण्यासह मयत वैद्यकीय अधिकारी यांच्या बंधुना अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे, खरे आहे.
(३) हे, खरे नाही.
(४) हे, खरे आहे.
(५) सदर प्रकरणी फलटण शहर पोलीस ठाणे गु.र.नं. ३४५/२०२५ भा.न्या.सं., २०२३ चे कलम ६४ (२)(एम), १०८ प्रमाणे दि.२४.१०.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र.१ यास दि.२६.१०.२०२५ व आरोपी क्र.२ यास दि.२५.१०.२०२५ रोजी अटक करण्यात येऊन सद्यस्थितीत दोन्ही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.
(६) सदर प्रकरणी समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आलेली असून पुढील तपास सुरू आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बनावट दिव्यांग प्रमाणपत्र प्रकरण व बदली प्रक्रियेतील अनियमिततेबाबत

**(२) * १६७७५ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या नोकरीत असलेल्या सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगत्वाची व त्यांच्या प्रमाणपत्रांची तीन महिन्यांत पडताळणी केल्यानंतर दिव्यांग कर्मचारी संशयास्पद आढळल्यास त्यांची फेरतापसणी करण्याचा अधिकार हा नियुक्ती अधिकाऱ्यांना असेल असा आदेश विभागाने काढला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात बनावट दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे बदली प्रक्रिया राबविण्यात आल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील किती दिव्यांग कर्मचाऱ्यांची दिव्यांगत्वाची प्रमाणपत्र खोटी व दिव्यंगत्वाचे प्रमाण ४० टक्क्यांहून कमी असल्याचे आढळून आले असून बनावट दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय व निमशासकीय स्तरावर विभागनिहाय किती बनावट लाभार्थ्यांनी नोकरी मिळवली आहे व अशा दोषी आढळून आलेल्या कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) केंद्र शासनाच्या दिनांक ३ मार्च, २०२३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनाव्दारे देण्यात आलेल्या सूचनांनुसार, दिव्यांग कल्याण विभागाच्या दिनांक २७ जुन, २०२४ च्या परिपत्रकान्वये केंद्र / राज्यशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या दिव्यांगासाठीच्या विविध योजना नोकरीमधील आरक्षण, पदोन्नती, सवलती इत्यादींचा लाभ मिळवण्यासाठी राज्यातील दिव्यांग व्यक्तींना वैश्विक ओळखपत्र अनिवार्य करण्यात आले आहे.

संशयास्पद दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकरी मिळविणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्या दिव्यांगत्वाची पडताळणी करुन अवैध / बनावट दिव्यांग प्रमाणपत्र धारक अधिकारी कर्मचाऱ्यांवर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ९१ नुसार कार्यवाही करणेबाबत, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्राव्दारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व) व दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या अर्धशासकीय पत्राव्दारे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना कळविण्यात आलेले आहे.

शासन निर्णय दि. ९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये दिव्यांगत्व प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे दिव्यांगत्व प्रमाणपत्राची पडताळणी करणेबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पडताळणीअंती संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे दिव्यांगत्व प्रमाणपत्र अवैध/ खोटे आढळल्यास अथवा पडताळणी अंती ज्यांचे दिव्यांगत्वाची टक्केवारी लाक्षणिक दिव्यांगत्वापेक्षा (४०%) कमी आढळल्यास त्यांचेवर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम-९१ नुसार कार्यवाही करावी. तसेच त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल ३ महिन्यांत या विभागास सादर करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. सदर मुदत दिनांक ८ जानेवारी, २०२६ रोजीपर्यंत आहे.

या विभागास बनावट दिव्यांगत्व प्रमाणपत्राबाबत (UDID) आत्तापर्यंत ७१९ कर्मचाऱ्यांबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार संबंधित विभागांना तक्रारप्राप्त दिव्यांग कर्मचाऱ्यांचे दिव्यांगत्व तसेच दिव्यांगत्व प्रमाणपत्र पडताळणीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन सदर प्रकरणांची कार्यवाही विविध विभागांमार्फत सुरु असून कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर अहवाल अपेक्षीत आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार लाक्षणिक दिव्यांगत्व (४०% किंवा त्यापेक्षा जास्त) असलेल्या दिव्यांगांनाच लाभ मिळणे अपेक्षीत आहे. त्यानुसार व केंद्र शासनाच्या सुचनेनुसार सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचे UDID कार्ड तपासणीचे निदेश दिले आहेत. त्यानुसार चुकीचे/ बनावट दिव्यांगत्व प्रमाणपत्राच्या आधारे लाभ घेणाऱ्या व्यक्तींवर संबंधित प्रशासकीय विभागाने कारवाई करणे अपेक्षीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील (ओ.बी.सी.) विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह, कार्यालय आणि अभ्यासिका उभारण्याबाबत

**(३) * १७२५५ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-**

**कोळीवाडा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील (ओ.बी.सी.) विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाकडून प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह, कार्यालय व अभ्यासिका उभारण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या जिल्ह्यांमध्ये वसतिगृह उभारणीसाठी मालकीची जागा अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही त्या जिल्ह्यांनी तातडीने योग्य जागा निश्चित करून प्रस्ताव सादर करावेत, अशा सूचना मा. महसूल मंत्री यांनी दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहर, पुणे, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यात ओ.बी.सी. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी तसेच, ज्या दहा जिल्ह्यांमध्ये दुग्धविकास विभागाच्या मालकीच्या जागा वसतिगृहासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत त्या जागा हस्तांतरित करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्याबाबत मा.मंत्री महोदयांनी संबंधितांना आदेश दिल्याचे माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय.

(२) व (३) होय, मा.महसूल मंत्री महोदयांनी सदरबाबत दि.०८.१०.२०२५ रोजी सर्व संबंधीत जिल्हाधिकारी यांना ऑनलाईन (VC) बैठकीद्वारे सुचना दिल्या आहेत.

(४) सद्यःस्थितीत वसतीगृहासाठी जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मोठ्या प्रमाणात गुटखा व अंमली पदार्थांची विक्री सुरु असल्याबाबत

**(४) * १५६३६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.संजय देरकर (वणी), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.राहूल कुल (दौंड),**

**श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखा बंदी असतानाही विशेषत: नवी मुंबई, अहिल्यानगर, जालना, अकोला, नाशिक, चंद्रपूर, सोलापूर, बुलढाणा, नागपूर व यवतमाळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गुटखा, मावा, सिगारेट, सुपारी, पान-मसाला व चरस-गांजाची विक्री सुरु असून, गुन्हे शाखेच्या अंमलीपदार्थ विरोधी पथकाने माहे जुलै, २०२५ मध्ये भिवंडीत रु.३.७८ कोटी, कामोठेतून रु.३.७८ कोटी व घणसोलीत रु.६० लाखांचा गुटखा जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुटख्याचा साठा हा गुजरात, राजस्थान येथून ट्रक, टेम्पो किंवा कंटेनरच्या माध्यमातून भाजीपाला, तेल, किराणामाल किंवा फळांच्या आड लपवला जाऊन एपीएमसी (नवी मुंबई) परिसरातील गोदामांमधून पनवेल, खारघर, नेरूळ, वाशी, तुर्भे, ऐरोली भागातील विक्रेत्यांपर्यंत पोहचविला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच श्रीरामपूर (जि.अहिल्यानगर) येथे माहे मे, २०२५ मध्ये रु.१४ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केल्यानंतर मेफेंटरमाईन हे औषध नशेसाठी कुरियरद्वारे मागवून विक्री करताना एका महिला व पुरुषाला तसेच बसस्थानक परिसरात नायट्राझेपम या गुंगी आणणाऱ्या औषधाची विक्री करतांना एका व्यक्तीला माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये पकडण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जिल्ह्यातील नगरसह, श्रीरामपूर, संगमनेर आणि शिर्डी शहरात गांजासह आरोग्यास घातक असलेल्या इंजेक्शनची विक्री शाळा, महाविद्यालयीन परिसरात विशेषत: पान टपऱ्यांवर मोठ्या प्रमाणात होत असून शाळा व महाविद्यालयांतील तरुण अंमली पदार्थांच्या आहारी जात असल्याने अशा टपऱ्या तोडण्याचे आदेश दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान पोलीस अधीक्षक यांनी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर गुटखा विक्री शहरासह ग्रामीण भागातील शाळांच्या आवारात सर्रास सुरु असल्यामुळे तसेच त्यामुळे कॅन्सरचे प्रमाण वाढत असल्याने संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह अंमली पदार्थ आणि अवैध व्यवसायावर कायमची बंदी आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

गुटखा, मावा, सिगारेट, सुपारी, पान मसाला व चरस-गांजाची विक्री याबाबत नवी मुंबई - ११४४, अहिल्यानगर-१८५, जालना-९०, अकोला-३५, नाशिक-१३१, चंद्रपूर-२३०, सोलापूर-१०८, बुलढाणा-६३४, नागपूर-४९ व यवतमाळ-१७०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र शासनाच्या गुटखा विक्रीस मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २७४, २७५, २२३ सह अन्नसुरक्षा मानके अधिनियम २००६ मधील कलम २६ कलम २७(२)(ई) अन्वये गु.नों.क्र. १३७/२०२५ नोंदवून रुपये १७,४०,०००/- किंमतीचा गुटखा जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या पुढील तपासामध्ये भिवंडी येथे रु. २,५४,८८,०००/- किमतीचा गुटखा, पानमसाला व त्याची वाहतूक करणाऱ्या अंदाजे रु. १,०५,००,०००/- किमतीची वाहने जप्त करण्यात आली आहेत. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये एकूण ५ आरोपी निष्पन्न झालेले असून सर्व आरोपींना जामीन मंजूर झालेला आहे. सदर गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा. न्यायालयामध्ये सादर करण्यात आले आहे.

प्रतिबंधीत पदार्थाविरोधी करण्यात येत असलेल्या कारवाई दरम्यान घणसोली परिसरामध्ये ६० लाख रुपये किंमतीचा गुटखा जप्त केल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(३) हे खरे नाही. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील एपीएमसी परिसरात भाजीपाला, तेल, किराणामाल किंवा फळांच्या आड लपवून गुटख्याची वाहतुक करण्यात येत असल्याबाबत गुन्हा निष्पन्न झालेला नाही.

(४) शाळा व महाविद्यालयाच्या १०० मीटर परिसरातील पानटपऱ्यांवर गुटखा/मावा/सिगारेट विक्री आढळल्याने पोलीस अधिक्षक, अहिल्यानगर यांनी दि. २६.०९.२०२५ च्या आदेशान्वये जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तत्काळ कारवाईचे आणि सदर बाब स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगर पालिका यांच्या निदर्शनास आणून देण्याचे आदेश दिले आहेत.

तसेच, शाळा व महाविद्यालयाच्या १०० मीटर परिसरातील गुटखा/तंबाखू/सिगारेट विक्री करणाऱ्या पान टपऱ्या/जनरल स्टोअर/किराणा दुकान यांचे अतिक्रमण काढण्याकरिता स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगर पालिका यांच्यासोबत पत्रव्यवहार करण्याचेही सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले आहे.

शाळेजवळील गुटखा विक्री थांबविण्यासाठी संयुक्त कारवाई पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

(५) हे खरे आहे.

(६) गुटखा साठा व त्याची विक्री कायमची बंद करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :

१. अंमली पदार्थाच्या व्यापारावर आळा घालण्याचे अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय नार्को कोऑर्डीनेशन सेंटर (NCORD) व जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती अशा समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत.

२. राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमाची आयुक्तालय स्तरावर आणि जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या त्रैमासिक आढावा बैठक नियमित घेऊन, सिगारेट व अन्य तंबाखुजन्य पदार्थ सेवनाचे अनुषंगाने सिगारेट व अन्य तंबाखुजन्य पदार्थ उत्पादने (जाहिरात, प्रतिबंध व व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) कायदा २००३ (COPTA) व राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

३. आयुक्तालयस्तरावरील आणि जिल्हानिहाय येणाऱ्या विविध पोलीस ठाणेतंर्गत शैक्षणिक संस्थाचे १०० मिटर परिसरात आणि आजुबाजुचे परीसरात दुकानांमध्ये नशाजन्य गोळया व चॉकलेट किंवा इतर काही खाद्यपदार्थांचे मुलांना विक्री होणार नाहीत, या अनुषंगाने नियमित पोलीस विभागामार्फत डमी ग्राहक पाठवुन पडताळणी करण्यात येत आहे.

४. आयुक्तालये आणि जिल्हास्तरावर शैक्षणिक संस्थामध्ये नशेमुळे मानवी शरीरावर होणारे परिणाम तसेच नशेचे प्रकार व सध्या ते कशाप्रकारे उपलब्ध होत आहेत, त्यांची ओळख, नशामुळे होणारे दुष्परिणाम, त्यापासून दूर राहणे इत्यादीबाबत जनजागृती करीता फेसबुक, ट्विटर या सोशल माध्यामांव्दारे प्रसिद्धी देण्यात येते.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ येथे टी.डब्ल्यु.जे. या कंपनीने गुंतवणूकदारांची केलेली फसवणूक

**(५) * २०७७९ श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ (जि.यवतमाळ) शहरातील जांब मार्गावरील टी.डब्ल्यु.जे. या गुंतवणूक कंपनीने चांगल्या परताव्याचे अमिष दाखवून ८४३ गुंतवणूकदारांची ४० कोटी रुपयांची फसवणूक केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आर्थिक फसवणूकीप्रकरणी गुंतवणूकधारकांनी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह ठेवीदारांच्या ठेवी परत मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) टी. डब्ल्यु. जे. या वित्तिय कंपनीच्या ठेवीदारांची संख्या एकूण ९४३ असल्याचे प्राप्त अभिलेखावरून आढळून आले आहेत. सदर प्रकरणी आत्तापर्यंतच्या तपासात एकूण ३६ ठेवीदारांच्या जवाब व कागदपत्रावरुन ४ कोटी ५८ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे.

(२) सदर प्रकरणी अवधूतवाडी पोलीस स्टेशन, यवतमाळ येथे गु. र. क्र. १३०६/२०२५, कलम ३१६ (२), ३१८ (४), ६१ (२), ३१६ (५), ३(५) बीएनएस, कलम ३ व ४ एमपीआयडी ॲक्ट १९९९ सह कलम ३,२१,५,२३,२५ अनियमित ठेव योजनांवर बंदी घालणारा कायद्या सन २०१९ अन्वये दि.२१.०९.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी टी. डब्ल्यु. जे. या वित्तिय संस्थेचे डायरेक्टर, व्यवस्थापक अशा एकूण ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर आरोपी सद्या न्यायालयीन कोठडीत आहे. या प्रकरणी फरार मुख्य आरोपी व त्यांची पत्नि यांचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक नेमले आहे. तसेच सायबर सेलची मदत व गोपनीय माहितीमार यांची मदत घेवून विशेष पोलीस पथकामार्फत शोध घेण्यात येत आहे. तसेच आरोपींच्या पासपोर्टनुसार Look Out नोटीस काढण्यात आलेली आहे. सदर वित्तिय संस्थेची फॉरेन्सीक ऑडीट करुन वित्तिय संस्था, डायरेक्टर, व्यवस्थापक अशा सर्वांची संपत्ती जप्त करुन ठेवीदारांना त्यांचे पैसे परत करण्याच्या अनुषंगाने तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय सेवेतील अनुसूचित जमातीची राखीव पदे भरण्याबाबत

**(६) * १७०४५ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय सेवांमध्ये अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदांवर १२ हजार ५०० व्यक्तींनी अनुसूचित जमातीचे बनावट प्रमाणपत्र सादर करून शासनाच्या विविध सेवांमध्ये नियुक्ती घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन दशकांमध्ये आदिवासी प्रवर्गातून एकूण ६३ हजार ६९३ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, ५१ हजार १७३ कर्मचाऱ्यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केले व १२ हजार ५२० कर्मचाऱ्यांनी अदयापपावेतो जातवैधता प्रमाणपत्र सादर केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेतील संरक्षण मिळू शकत नाही, असा स्पष्ट निर्णय दिनांक ०६ जुलै, २०१७ रोजी वा त्या दरम्यान दिला असून या निर्णयाची अंमलबजावणी राज्य शासनाने केली आहे काय ,
(४) असल्यास, शासकीय सेवांमधील जातप्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदांवर वर्ग करण्याची तरतूद करण्यात आली व त्या अतंर्गत अनुसूचित जमातीसाठी राखीव पदे रिक्त करण्यात आली आहेत काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रिक्त असलेल्या अनुसूचित जमातीच्या पदांवर तात्काळ पद भरती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
सर्व प्रशासकीय विभागांनी २०१८ मध्ये सादर केलेल्या माहितीनुसार सन १९९५ ते २०१५ या कालावधीत शासन सेवेत नियुक्ती झालेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचाऱ्यांपैकी एकूण १२५२० कर्मचारी जातवैधता प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) अनुसूचित जमाती प्रवर्गाचे जातप्रमाणपत्र अवैध ठरलेल्या / सादर करु न शकलेल्या कर्मचाऱ्यांना शासन निर्णय दिनांक २१.१२.२०१९ अन्वये अधिसंख्य पदांवर वर्ग केल्यामुळे रिक्त झालेल्या जागांवर अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याच्या सूचना सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या असून नियमित पदभरतीद्वारे पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) शहरातील वाहतूक कोंडीस कारणीभूत असलेल्या वाहतूक पोलीसांविरुद्ध कारवाई करण्याबाबत

**(७) * १८२३२ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी शासनाने अवजड वाहनांना ठराविक वेळेत वाहतूक करण्यास परवानगी दिलेली असतानाही वाहतूक पोलीस वाहन चालकाबरोबर अर्थपूर्ण व्यवहार करुन गोदामांमध्ये जाणाऱ्या अवजड वाहनांना शहरात वाहतूक करण्यास परवानगी देत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉ.चौधरी यांनी वाहतूक कोंडीत अडकलेले असताना फेसबुक लाइव्ह करत वाहतूक पोलीसांचा व्यवहार जनतेसमोर आणला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या नियमाचे उल्लंघन करुन अवजड वाहनांची वाहतूक होत असल्याने ठाणे शहरातील घोडबंदर, भिवंडी तसेच अंजूरफाटा, काल्हेर, कशेळी ते ठाणे तसेच वळगाव दापोडे, मानकोली तसेच पिंपळास ते खारेगाव पुलापर्यंत प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी वाहतूक पोलीसांविरुद्ध तसेच वाहतूक कोंडीस कारणीभूत असलेल्या अवजड वाहनांवर कारवाई करण्यासह सदर वाहतुक कोंडी कायमस्वरुपी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

तथापि, डॉ. चौधरी हे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये माणकोली जंक्शन येथे वाहतूक कोंडीत अडकलेले असताना फेसबुक लाईव्ह केलेले होते. मानकोली ते अंजुर चौक या परिसरात टप्प्या टप्प्यावर विविध ठिकाणी अनेक गोडाऊन/वेअर हाऊस मध्ये हलकी वाहने माल ने-आण करीत असतात. तसेच अवजड वाहने वाहतूक नियंत्रण अधिसुचने नुसार शहरात प्रवेश करून वेळेनुसार आत बाहेर जा-ये करीत असतात. ज्या पध्दतीने वाहतूक चालते त्या पध्दतीने टप्प्या टप्पाने वाहतूक मानकोली येथून भिंवडी शहरात सोडण्यात येते. त्यादरम्यान मानकोली येथे कार/रिक्षा/मोटारसायकल अशा हलक्या वाहनांकरिता स्वतंत्र लेन तयार करण्यात आली आहे. याबाबत डॉ. चौधरी यांना माहिती नसल्याने त्यांनी या लेनचा वापर केल्याने मानकोली पोलीस चौक येथील वाहतूक विनाकरण थांबवून ई-चलन पावती बाबत व्हिडीओ गैर समजुतीने केला आहे. याबाबत त्यांची काहीएक तक्रार नाही तसे त्यांनी लेखी दिलेले आहे.
(३) होय, हे खरे आहे.

ठाणे शहरात येणाऱ्या मुंबई नाशिक समृध्दी महामार्गाचे एम.एस.आर.डी.सी. कडून काम करण्यात येत असून काही ठिकाणी सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम चालू आहे. त्यातच पिंपळास, खारेगाव, दिवे अंजुर, मोठागाव येथे अंडरपासचे तसेच कशेळी व साकेत येथे ब्रिजचे काम चालू असल्याने सदर ठिकाणी बॉटेल नेक तयार होऊन वाहतूक कोंडी होत आहे.

तसेच भिंवडी तालुक्यातील ग्रामीण भागात ५० ते ५५ हजाराच्या आसपास गोडावून असून गोडावूनमध्ये मोठ्या प्रमाणात अवजड वाहने येत असल्याने व त्या परिसरात कोठेही पार्कींग लॉटस उपलब्ध नसल्याने वाहतूक कोंडी होत आहे.
(४) वाहतूक कोंडी करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायदा कलम १७९(१) प्रमाणे माहे जानेवारी, २०२५ ते आजपर्यंत १,११,६८५ केसेस करण्यात आलेल्या असून त्यापैकी भिंवडी, नारपोली व कोनगाव वाहतूक विभागात एकूण ३७,६९२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

तसेच वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे:-

१) भिवंडी, नारपोली, माणकोली, अंजुरफाटा, काल्हेर, कशेळी, ओवळीगाव, दापोड गांव, अंजुर गाव परिसरात मोठ्या प्रमाणात गोडावून असल्याने स्थानिक वाहने व अवजड वाहनांकरिता माणकोली भागात लेन पध्दती सुरु करण्यात आलेली आहे.
२) सदर परिसरातील गोडावून मध्ये जाण्याकरिता असलेल्या गल्ल्या, मुख्य रस्ते याची दुरावस्था झालेली असल्याने स्थानिक ग्रामपंचायत, पी. डब्ल्यु. डी., मेट्रो याच्या सहाय्याने दुरुस्ती करण्यात आलेली आहे.
३) सदर भागातील रस्त्यावर असलेली अतिक्रमणे हटविण्यात आलेली आहेत.
४) अंजुर फाटा ते कशेळी भागात एकूण १२ ठिकाणी हाईट बॅरिकेटस लावण्याचे प्रस्तावित असून सध्या २ ठिकाणी हाईट बॅरिकेटस लावण्यात आलेले आहेत.

५) भिवंडी वाहतूक विभागाकरीता असलेले ७ अधिकारी, १९७ अंमलदार व ५४ वार्डन असे वाहतूक सुरळीत ठेवणेकामी नेमण्यात आलेले आहेत. त्यांचेवर स.पो.आ. दर्जाचे अधिकारी देखरेख करीत आहेत. परंतु भिवंडी वाहतूक विभागातील नारपोली, मानकोली, अंजुरफाटा, कशेळी, काल्हेर येथे वाहतूक कोंडी अधिक होत असल्याने त्यानुषंगाने नारपोली वाहतूक उप विभागाकरिता ४ पोलीस अधिकारी, २० पोलीस अंमलदार व ४४ वार्डन असे अतिरीक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिर्डी (जि.अहिल्यानगर) येथील ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट फायनान्स कंपनीच्या संचालकांनी हजारो लोकांची केलेली फसवणूक**

**(८) * १७६१२ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (जि.अहिल्यानगर) येथील ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट फायनान्स कंपनीच्या संचालकांनी गुंतवणुकीवर १५ ते ३० टक्के परतावा देण्याचे अमिष दाखवून ४० हजार लोकांची १३०० कोटीहून अधिक रुपयांची फसवणूक केली असल्याचे दिनांक २९ जुलै, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्रकरणी कंपनीच्या संचालकांविरोधात राहुरी आणि शिर्डी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे, काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपींनी गुंतवणुकदार/ साक्षीदार यांना गुंतवणुकीवर १० ते १५ टक्के परतावा देण्याचे आमीष दाखवुन आजपावेतो एकुण २०२ गुंतवणुकदारांची रु.२८,६६,६३,५२३/- इतक्या रकमेची फसवणुक झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानुषंगाने शिर्डी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ७२६/२०२५ भा.न्या.सं २०२३ चे कलम ३१६(२), ३१६(५), ३१८(४), ३(५) सह एम.पी.आय.डी. कलम ३ प्रमाणे व राहाता पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २७३/२०२५ भा.न्या.सं २०२३ चे कलम ३१६(२), ३१६(५), ३१८(२), ३१८(४), ३(५) सह एम.पी.आय.डी. कलम ३ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

ग्रो मोअर कंपनीचे संचालक व एजंट यांच्या विरुध्द पोलीस ठाणे, शिर्डी व पोलीस ठाणे, राहाता येथे उपरोक्त प्रमाणे गुन्हे दाखल असुन पोलीस ठाणे, राहुरी येथे कंपनीच्या संचालकांविरुध्द कोणताही गुन्हा दाखल नाही.

(३) सदर प्रकरणी उपरोक्त प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले असुन दोन्ही गुन्ह्यातील मुख्य आरोपींना अटक करुन त्यांच्या विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) विलंब नाही.

-----------------

**राज्यातील अनफिट स्कूल बस व व्हॅनमधून विद्यार्थ्यांची होणारी धोकादायक वाहतूक**

**(९) * १५७०५ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.तुकाराम काते (चेंबूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबईसह इतर शहरी भागात बसच्या ऐवजी रिक्षा, खाजगी कार, पांढऱ्या नंबर प्लेट असलेली वाहने, प्रदुषण नियंत्रण (PUC) आयुर्मान संपलेली वाहने यांचा वापर विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी केला जात असून सदर बेकायदेशीर वाहतुकीमुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहर व उपनगरांमध्ये बेकायदेशीर शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनांमधील ११० शालेय बस, ४५५ व्हॅन/रिक्षा व इतर अवैध वाहने यावर शासनाने माहे एप्रिल, २०२५ ते जुलै, २०२५ मध्ये कारवाई करण्यात येवूनही वाहनचालकामध्ये सुधारणा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्हयात शालेय विद्यार्थ्यांसंबंधी अनुचित घटना टाळण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची अंतिम मुदत ३१ जुलै, २०२५ अशी निश्चित करण्यात आली असून प्रत्यक्षात किती सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत तसेच, सीसीटीव्ही नसलेल्या व फिटनेस प्रमाणपत्र न घेणाऱ्या शालेय वाहनांवर आरटीओमार्फत 'वायुवेग पथक' स्थापित करण्यात आले असून शालेय पातळीवर व जिल्हास्तरावर विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसंदर्भात समित्या स्थापन केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर शहरातील मानकापूर उड्डाणपुलावर स्कुल व्हॅन व बसमध्ये झालेल्या अपघातात एका शालेय विद्यार्थ्यासह चालकाचा माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये मृत्यू झाला असून नागपूर येथील तिन्ही प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात एकूण ३९९३ स्कूल बस व व्हॅनच्या नोंदीपैकी सुमारे ८ ते १० टक्के स्कूल बस, व्हॅन व स्कुल व्हॅन व बस यांचेकडे फिटनेस प्रमाणपत्र नसतानाही विद्यार्थ्यांची धोकादायक वाहतूक सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार स्कुल व्हॅन व बसमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यासाठी कार्यवाही करणेसह अनफिट स्कूल बस व व्हॅन चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) विना परवाना, अवैधरित्या विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर परिवहन विभागाच्या वायुवेग पथकांद्वारे नियमितपणे दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(२) मुंबई शहर व उपनगरांमध्ये विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी ७६६ स्कूल बस व इतर १७०५ व्हॅन / रिक्षा व इतर वाहने तपासण्यात आली आहेत. त्यापैकी अवैधरित्या विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या ११० स्कूल बस व ४५५ व्हॅन / रिक्षा व इतर अवैध वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली असून रूपये २५.५२ लक्ष इतका दंड आकारण्यात आलेला आहे.

(३) शालेय विद्यार्थी वाहतुक करणाऱ्या वाहनांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक ०३.१०.२०२४ रोजीच्या पत्रानुसार दिनांक ३१ जुलै २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांचे कार्यक्षेत्रामध्ये ५६०८ स्कुल बसेस वाहनांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्यामार्फत ६६१ वाहने तपासण्यात आली असून सीसीटीव्ही व वैध योग्यता प्रमाणपत्र नसलेल्या ४७ दोषी स्कुल बसेसवर कारवाई करण्यात आली असून एकूण रुपये ४.२३ लक्ष इतका दंड वसुल करण्यात आला आहे.

शालेय स्तरावर परिवहन समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्या कार्यक्षेत्रात पोलीस आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्कुल बस सुरक्षितता समितीची स्थापना करण्यात आली आहे.

(४) नागपूर शहरातील मानकापूर उड्डाणपुलावर स्कुल व्हॅन व बसमध्ये झालेल्या अपघाताच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर), नागपूर (ग्रामीण), नागपूर (पूर्व) कार्यालयांच्या वायुवेग पथकाद्वारे नियमितपणे वाहनांची तपासणी करण्यात येत असून अवैधरित्या विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या एकूण २४८ दोषी वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली असून रुपये ८३.०६ /- लक्ष इतका दंड आकारण्यात आलेला आहे.

(५) विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूल बसेस व इतर वाहनांची नियमितपणे तपासणी करणेबाबत क्षेत्रिय कार्यालयांना वेळोवेळी सूचना जारी करण्यात आलेल्या आहेत.

दिनांक १ एप्रिल, २०२५ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या एकूण ३६१४ दोषी वाहनांवर कारवाई करण्यात आली असून रुपये ३२८.४४ लक्ष इतका दंड आकारण्यात आला आहे.

वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र, योग्यता प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, परवाना, वायू प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र, वाहन चालविण्याचे लायसन्स, अग्निशामक, प्रथमोपचार पेटी इ. बाबींची पूर्तता करणे बंधनकारक आहे. दिनांक २४.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये शालेय विद्यार्थ्यांना सुनियोजित, सुरक्षित वाहतूकीसाठी नवीन सुधारीत नियमावली तयार करण्यासाठी एक सदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पवई येथे राहत असलेल्या महिला डॉक्टरवर झालेल्या हल्ल्याबाबत

**(१०) * १९६९७ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पवई येथे राहत असलेल्या डॉ. आसिफा शेख या महिला डॉक्टरवर चाकू आणि सळईने हल्ला केल्याची घटना दिनांक ७ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पवई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मुंबईतील पवई येथे राहत असलेल्या डॉ. आसिफा शेख या महिला डॉक्टरवर आरोपी अब्दुल्ला ज्युबेर खान याने काहीही कारण नसताना दारुच्या नशेत चाकू आणि सळईने हल्ला केला असल्याने फिर्यादी डॉ.आसिफा शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पवई पोलीस ठाणे मुंबई येथे दि.०७.०९.२०२५ रोजी गु.र.क्र.

९४६/२०२५, बी.एन.एस. मधील कलम ३२४ (५) सह शस्त्र अधिनियम, १९५९ मधील कलम ४, २५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम ३७(१), १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) सदर गुन्हयातील आरोपी अब्दुल्ला ज्युबेर खान यास दि.२०.०९.२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. त्याच्याविरुध्द पुरावे उपलब्ध करून मा.न्यायालयात दोषारोपपत्र कोर्ट केस क्र.३५४७/पीडब्ल्यु/२०२५, दि.०४/११/२०२५ अन्वये दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिंचोली (ता.राहुरी, जि.अहिल्यानगर) तसेच बेळगांव ते कुडाळ या दरम्यान लाल सुपारी व सुगंधित मसाला तंबाखू जप्त केल्याबाबत

**(११) * १५८५३ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंचोली (ता.राहुरी, जि.अहिल्यानगर) गावाच्या शिवारात कर्नाटकमधून आलेली आणि गुजरातकडे चाललेली तब्बल ६ कोटी १७ लाख ८५ हजार रुपये किंमतीची लाल सुपारी, १५ लाख ६० हजार रुपये किंमतीच्या तंबाखूसह २ कोटी १० लाख रुपये किंमतीच्या १३ मालमोटारी असा एकूण ८ कोटी ४३ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल अहिल्यानगर पोलिसांनी दिनांक २९ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा जप्त केलेला मुद्देमाल हा शासनाचा कर चुकवून व बनावट देयके तयार करुन तसेच गुटख्यासाठी सुपारी वापरली जात असल्याच्या कारणावरून जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच बेळगांव ते कुडाळ यादरम्यान सुगंधित मसाला तंबाखूच्या मालाचा ट्रक कुडाळ पोलीसांनी जप्त केला असून, यामध्ये १ लाख ७२ हजार ५८ रुपयांचा मुद्देमाल असल्याचे दिनांक ४ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह लाल सुपारी व सुगंधित मसाला तंबाखूच्या अवैध वाहतूकीस आळा घालण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

दि.२६.०८.२०२५ रोजी कर्नाटक राज्यातुन कर चुकवुन व बनावट बिले तयार करुन लाल सुपारी व तंबाखु असलेले एकुण १३ ट्रक अहिल्यानगर मार्गे गुजरात राज्यामध्ये जात असल्याची माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर पथकाने राहुरी पोलीस ठाणे, जि.अहिल्यानगर यांच्या हद्दीमध्ये कारवाई करुन ताब्यात घेतलेल्या ट्रक मध्ये एकुण रु.६,३३,४५,००/- किंमतीची लाल सुपारी व रु.१५,६०,०००/- किंमतीची तंबाखु मिळुन आली आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

उपरोक्त प्रमाणे ताब्यात घेतलेल्या ट्रकातील मालाच्या जी.एस.टी. बीलांची पंचासमक्ष पाहणी केली असता सदरचे बिल हे कर चुकवुन व बनावट बिले तयार करुन आणले आहेत किंवा कसे याची खात्री करण्याकरिता कार्यालय प्रमुख, राज्य कर सह आयुक्त, वस्तु व सेवा कर विभाग यांना कळविण्यात आले होते.

त्यानुषंगाने, कार्यालय प्रमुख, राज्यकर सह आयुक्त, वस्तु व सेवा कर विभाग यांनी त्यांच्या स्तरावर योग्य ती कारवाई करुन ताब्यात घेतलेले सर्व ट्रक हे चालक/मालक यांच्या ताब्यात देण्याबाबत दि.२९.०८.२०२५ रोजी आदेश निर्गमित केले असल्याने त्या आदेशास अनुसरुन सर्व ट्रक चालक/मालक यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

तसेच सदर प्रकरणी जप्त करण्यात आलेली लाल रंगाची सुपारी व तंबाखु खाण्यास अपायकार आहे किंवा कसे याबाबत अभिप्राय मिळणेबाबत अन्न व औषध प्रशासन विभाग यांना पत्रव्यवहार करुन विनंती करण्यात आली होती. त्यानुषंगाने सहायक आयुक्त (अन्न) तथा पदावधीत अधिकारी, अन्न व औषध प्रशासन विभाग (म.राज्य), अहिल्यानगर यांनी त्यांच्या दि.०१.०९.२०२५ च्या पत्रान्वये "महाराष्ट्र राज्यामध्ये साधी तंबाखु, सुगंधित व गोडवायुक्त नसलेली सुपारी यांचे उत्पादन, साठा, वाहतुक, विक्री वर कोणतीही बंदी नाही, त्यामुळे सदर प्रकरणी प्रतिबंधित अन्न पदार्थांच्या अनुषंगाने कारवाई घेणे शक्य नाही" असे अभिप्राय दिल्यामुळे सदर प्रकरणामध्ये कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

दि.११/०९/२०२५ रोजी कुडाळ पोलीस ठाणे हद्दीत एम.आय.डी.सी. कुडाळ तिठा येथे विक्री करण्याकरिता मागविण्यात आलेला महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला व शरीरास अपायकारक असा पान मसाला व सुगंधी तंबाखु असा एकुण रु.७२,०७८/- किंमतीचा मुद्देमाल व रु.१०,०००,००/- रु किंमतीचा टाटा ट्रक या वाहनातुन अवैधरित्या वाहतुक करीत असतांना मिळुन आलेला आहे.

(४) सदर प्रकरणी कुडाळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३१४/२०२५ अन्न सुरक्षा आणि मानके अधि.क्र.५९ सह भा.न्या.सं. कलम १२३, २७४, ३(५) प्रमाणे दि. ११/०९/२०२५ रोजी तीन आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील तीन आरोपींपैकी आरोपी क्र.१ यास दि. २०/११/२०२५ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ-कोल्हापुर यांनी अटक पुर्व जामिन मंजुर केलेला आहे व उर्वरित आरोपी क्र.२ व ३ यांना अटक करुन त्यांच्याविरुध्द कुडाळ पोलीस ठाणे चॅप्टर केस रजि. नं. ९६/२०२५ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १२६ अन्वये दि. २९.०९.२०२५ रोजी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमंग इन्स्टिट्युट ऑफ ऑटीझम आणि मल्टीडिसेबिलीटी रिसर्च सेंटर, लातूर या सेंटरला मान्यता व अनुदान मंजूर करणेबाबत

**(१२) * १८३६१ श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर (जि.लातूर) येथील उमंग इन्स्टिट्युट ऑफ ऑटीझम आणि मल्टीडिसेबिलीटी रिसर्च सेंटर हे स्वमग्नता, बहुविकलांगता, सेरेब्रल मापन, अतिचंचलपणा, मतीमंद, गतिमंद आणि बधीर अशा ऑटीझम दिव्यांगावर उपचारासाठी कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सेंटरला शासकीय मान्यता व अनुदान मंजूर करण्याबाबत सदरील सेंटरने सादर केलेल्या प्रस्तावास विशेष बाब म्हणून मान्यता देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दिव्यांगांवर उपचार करणाऱ्या सेंटरला मा.उपमुख्यमंत्री, तत्कालीन समाजकल्याण मंत्री आदींनी भेट देऊन या सेंटरमार्फत होत असलेल्या सामाजिक कामाची प्रत्यक्ष पाहणी करून या सेंटरला मान्यता व अनुदान देण्याचे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती घेवून दिव्यांगावर उपचार करीत असलेल्या उक्त सेंटरला शासनाची मान्यता व आवश्यक अनुदान मंजुरीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी मा. विधानसभा सदस्य यांनी दिनांक २९ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांना विनंती केल्याबाबतचे पत्र विभागास प्राप्त झालेले आहे.
(३) तत्कालीन मा. मंत्री, सामाजिक न्याय यांनी दिनांक २५ जुन, २०२१ रोजी उमंग इन्स्टिट्यूट ऑफ ऑटीझम आणि मल्टीडिसेबिलीटी रिसर्च सेंटर, लातूर येथे भेट दिली. तर तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी लातुर येथील भेटी दरम्यान दिनांक १२ मे, २०२३ रोजी सदर सेंटरबाबत माहिती घेतली आहे. तथापि, त्यांनी सेंटरला मान्यता व अनुदान देण्याचे आश्वासन दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.
(४) दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय, दिनांक १६ जुलै, २०२४ अन्वये राज्यातील दिव्यांगांच्या कायम विना अनुदानित / विना अनुदानित विशेष शाळा, संलग्न वसतीगृहे, कार्यशाळा (प्रशिक्षण केंद्र) आणि अनाथ मतिमंदांची बालगृहे या उपक्रमांच्या अनुदानासंबंधी शासनाचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. तथापि, दिव्यांगत्वावर संशोधन व उपचार करणाऱ्या संस्थांना ‘विशेष बाब’ म्हणून अनुदान देण्याबाबत या विभागाकडे धोरण नाही. केंद्र शासनाच्या दिनदयाल दिव्यांगजन पुनर्वसन योजना (DDRS) या योजनेंतर्गत दिव्यांग कल्याण, पुनर्वसन व सक्षमीकरण इत्यादी क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देण्यात येते. सबब, उमंग इन्स्टीट्यूट ऑफ ऑटीझम ॲन्ड मल्टीडिसेबीलीटी रिसर्च सेंटर, लातुर या रिसर्च सेंटर या संस्थेचा केंद्र शासनाच्या सदर योजनेंतर्गत अनुदान मिळणेबाबत विहीत नमूऩ्यात प्रस्ताव सादर केल्यास, त्याबाबत केंद्र शासनास राज्य शासनाव्दारे शिफारस करुन अनुदान मिळणेबाबत सहाय्य करण्यात येईल. यास्तव संबंधित संस्थेचा प्रस्ताव जिल्हा दिव्यांग पुनर्वसन (DDRS) योजनेंतर्गत सादर करण्याबाबत दिनांक १ डिसेंबर, २०२५ रोजीच्या पत्राद्वारे संबंधितांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कराड (जि.सातारा) येथील यशवंत को.ऑप. बँकेमध्ये कोट्यवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(१३) * १८०७१ श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) कराड (जि.सातारा) येथील यशवंत को.ऑप. बँकेमध्ये सुमारे ११२ कोटी १० लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार बँकेच्या सनदी लेखापाल (Chartered accountant) यांनी करुन ५० व्यक्तींविरुध्द सातारा पोलीस स्थानकात गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) यशवंत को.ऑप बँकेचे सनदी लेखापाल यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कराड शहर पोलीस ठाणे गु.र.नं. ११६८/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ६१, ३१६ (२), ३१६(४). ३१८(४), ३३६(३). ३३८. ३३९. ३४०(२) ३(५) अन्वये दि.११/१०/२०२५ रोजी ५० व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.
(३) सदर गुन्ह्यामध्ये फसवणूक केलेली रक्कम ११२ कोटी १० लाख रुपये एवढी मोठी असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब गुन्हाच्या तपास आर्थिक गुन्हे शाखा, सातारा यांचेकडे सोपवण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोटे (ता. खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीमध्ये तथाकथित महाराजाने अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण केल्याबाबत

**(१४)** * **१५६७१ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) लोटे (ता. खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीमध्ये श्री संत ज्ञानेश्वर माउली जीवन मुक्तिधाम सेवा ही संस्था चालविणाऱ्या भगवान कोकरे या तथाकथित महाराजाने धार्मिक शिक्षण आणि साधनेच्या नावाखाली अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भगवान कोकरे यांच्याकडून अन्य अनेक अनाथ, निराधार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलींचे मोफत शिक्षण व आध्यात्मिक संस्कार देण्याच्या नावाखाली लैंगिक शोषण आणि अमानुष वर्तनाचे प्रकार सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर प्रकरणी स्वतंत्र तपास यंत्रणेद्वारे सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) खरे आहे.
(३) सदर प्रकरणाच्या अनुषंगाने खेड पोलीस ठाणे येथे खालीलप्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत :-

i. गु. र. नं.३१३/२०२५, भा.न्या.सं., २०२३ चे कलम ७४, ३५१ (३), ३(५) सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम १२, १७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
   उक्त प्रकरणी गुन्ह्यातील दोन्ही आरोपींस दि.१४.१०.२०२५ रोजी अटक करण्यात आली असून २ दिवसांची पोलीस कोठडी आणि दि.१६.१०.२०२५ ते दि.३१.१०.२०२५ रोजीपर्यंत न्यायालयीन कोठडी मिळाली होती. सदर आरोपींस दि.३१.१०.२०२५ रोजी मा न्यायालयाने जामिन मंजुर केलेला आहे. तसेच आरोपींवर बी.एन.एस.एस., २०२३ चे कलम १२६ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.
ii. गु.र.नं.३१७/२०२५ भा.न्या.सं., २०२३ चे कलम ६४ (२)(आय), ६५(१), ७४, ३५१(३), ३(५) सह लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ८, १७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
   उक्त प्रकरणी गुन्ह्यातील दोन आरोपींस दि.१८.१०.२०२५ रोजी अटक करून न्यायालयीन

कोठडी सुनावण्यात आली होती. सदर आरोपींस दि.०६.११.२०२५ रोजी मा.न्यायालयाने जामिन मंजुर केला आहे. तसेच गुन्ह्यातील इतर एका आरोपीस दि.११.११.२०२५ रोजी मा.न्यायालयाने अटकपुर्व जामिन मंजुर केला आहे. तसेच गुन्ह्यातील सर्व आरोपींवर बी.एन.एस.एस., २०२३ चे कलम १२६ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्ह्यात झालेल्या हत्येच्या संदर्भात चौकशी करण्याबाबत**

**(१५) * १५६६९ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहरातील पोलीस अधीक्षक कार्यालयापासून ५०० मीटर अंतरावर अल्पसंख्याक समाजातील श्री.यश ढाका या तरुणाची एका टोळीने दिनांक २५ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान टोळक्याने हत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात व्हिडिओ पुरावे उपलब्ध असूनही काही आरोपींची नावे जाणीवपूर्वक वगळण्याचा पोलिसांवर आरोप करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच परळी (जि.बीड) येथील श्री. महादेव मुंडे यांची दिनांक २१ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान हत्या झाल्यानंतर एकाही आरोपीला अटक न झाल्याने, या हत्येचा तपास करण्यासाठी आय.पी.एस. अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एस.आय.टी. ची नियुक्ती दिनांक ३१ जुलै, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

सदर घटना दि.२१.१०.२०२३ रोजी घडलेली असून या प्रकरणी हत्येचा तपास करण्यासाठी अपर पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रामीण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०१.०८.२०२५ रोजी एस.आय.टी.ची स्थापना करण्यात आली आहे. एस.आय.टी. मार्फत पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न भाग-१ येथील नमूद प्रकरणी दि.२६.०९.२०२५ रोजी गु. र.नं. ४८१/२०२५ अन्वये भा.न्या. सं.,२०२३ चे कलम १०३, ३(५) सह अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ कलम ३(१)(r)(s), ३(२)(v) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच गुन्ह्यातील चारही आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील सावरकूट-अजनूप या आदिवासी वाड्यात ट्रान्सफार्मर उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) * १६६३५ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील सावरकूट-अजनूप या आदिवासी वाडीतील ग्रामस्थांना वीज मिळावी यासाठी ६३ किलोवॅट क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात येऊन तत्कालीन जिल्हाधिकारी, ठाणे यांनी जिल्हा नियोजन समितीमार्फत (DPC) २५ लाख रुपयांचा निधी वितरित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निधी मंजूर करुन तीन वर्षांचा कालावधी लोटल्यानंतर देखील वीज वितरण कंपनीतील अधिकाऱ्यांच्या गैरकारभारामुळे गावात वीज येऊ शकली नसल्याचे दिनांक ९ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चाकशी केली आहे,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासह उक्त आदिवासी वाड्यात ट्रान्सफार्मर उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही,

सावरकूट-अजनूप येथे नविन ६३ केव्हीए रोहीत्र व लघुदाब वहिनीचे कामासाठी रु. २४.५२ लक्ष अंदाजपत्रक प्रस्तावित होते. तथापि, सदरचा भाग अतिदुर्गम असल्याने साधनसामुग्रीच्या वाहतूकीसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध नव्हता. तसेच वनविभागाची हरकत असल्याने कामाची सुरवात करणे शक्य झाले नाही. त्यामुळे पर्यायी मार्गाचे सर्वेक्षण करुन सदर ठिकाणी अखंडीत वीजपुरवठा करण्याकरिता २२ केव्ही कव्हर कंडक्टर प्रस्तावित करुन सुधारित अंदाजपत्रक दि.०४.११.२०२५ रोजी मंजूर करुन, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प, शहापूर यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी वितरणासाठी पाठविण्यात आले होते. त्यानुसार, त्यांचेमार्फत सदरचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत प्रशासकीय मान्यतेकरिता सादर करण्यात आलेला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक, जालना तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात नोकरी लावून देण्याचे अमिष दाखवून केलेली फसवणूक

**(१७) * १७३६४ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक, जालना तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात लिपिक पदावर नोकरी लावून देण्याचे अमिष दाखवून सुमारे १५ लोकांची ५० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी लिपिक पदावर नोकरी लावून देतो असे सांगून सिल्लोड तालुक्यातील १५ लोकांकडून फोन पे, गुगल पे आदी ऑनलाइन माध्यमांद्वारे सुमारे ५० लाख रुपये घेऊन व जिल्हाधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षरीसह बनावट नियुक्तीपत्र, मेल तसेच व्हॉट्सॲपद्वारे पाठविल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह पिडीतांना न्याय मिळवून देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

नाशिक, जालना, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात लिपिक पदावर नोकरी लावून देण्याचे अमिष दाखवून १५ लोकांची एकूण ४९ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पो.स्टे. सिल्लोड ग्रामीण, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे गु.र.नं. ३४१/२०२५ भा.न्या.सं. कलम ३१८(४), ३३६(३), ३४०(२), ३४१(३), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपीने लिपिक पदावर नोकरीचे जिल्हाधिकारी कार्यालयाचे बनावट सहीचे नियुक्ती पत्र देवून १५ लोकांकडून फोन पे, गुगल पे तसेच रोख स्वरुपात रु. ४९ लाख घेवून पिडीतांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झालेले आहे.

(३) उपरोक्त प्रमाणे फसवणूक झाल्याने उक्तप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्यात आरोपीस अटक करुन तसेच आरोपीविरुध्द सबळ पुरावे हस्तगत करुन मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**घनसावंगी (जि. जालना) येथील शेतकऱ्यांना "सौर कृषि पंप" उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१८)** * **१८८८६ श्री.हिकमत उढाण (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या "मागेल त्याला सौर कृषी पंप" या योजनेंतर्गत अनेक शेतकऱ्यांनी केलेले अर्ज मंजूर करून त्यांना सौर कृषि पंप मंजूर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घनसावंगी (जि. जालना) येथील शेतकऱ्यांनी अनुदानाची रक्कम भरल्यानंतर ६० दिवसांत सौर कृषि पंप देणे आवश्यक असताना देखील सहा महिने उलटून गेल्यावरही त्यांना सौर पंप बसवून देण्यात आले नसून शेतकऱ्यांनी भरलेली अनुदानाची रक्कमही परत करण्यात आली नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास "मागेल त्याला सौर कृषी पंप" योजनेंतर्गत पंप वितरणाची नोंदणी व पडताळणी प्रक्रिया विहीत पध्दतीने व पारदर्शीपणे होते किंवा नाही याची तपासणी करण्यात येते काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांनी मागणी केल्यानुसार सौर कृषि पंप उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही,

जालना जिल्ह्यातील घनसावंगी येथे मागेल त्याला कृषीपंप योजनेंतर्गत एकूण ८५३५ लाभार्थ्यांनी लाभार्थी हिस्सा भरलेला आहे. त्यापैकी ५३८४ लाभार्थ्यांनी पुरवठादाराची निवड केली असून ३६५० सौर पंप आस्थापित करण्यात आलेले आहेत व उर्वरित शेतकऱ्यांचे सौर कृषीपंप आस्थापित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे .

(३) व (४) मागेल त्याला सौर कृषि पंप योजनेअंतर्गत भार्थी https://www.mahadiscom.in/solar_MTSKPY या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज करु शकतात. अर्जाची पडताळणी जेष्ठता क्रमानुसार होते. या योजनेंतर्गत पंप वितरणाची नोंदणी व पडताळणी प्रक्रिया संपूर्णपणे ऑनलाइन असल्याने पारदर्शी आहे. लाभार्थी पुरवठादाराची निवड व अर्जाची सद्यस्थिती संकेतस्थळावर पाहू शकतात. पुरवठादारास कार्यादेश दिनांकापासुन ६० दिवसांच्या मुदतीत सौर कृषी पंप कार्यान्वित न केल्यास संबंधीत पुरवठादारास ६० दिवसानंतर प्रती आठवडा ०.५ % इतका व जास्तीत जास्त एकुण कार्यादेशाच्या १०% रक्कम दंड लावण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील इतर मागासवर्गीय वसतिगृह प्रवेशप्रक्रिया पूर्ण करणेबाबत

**(१९) * १८६४३ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीची वसतिगृह प्रवेशप्रक्रिया प्रलंबित राहिल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्धे शैक्षणिक वर्ष संपूनही या विद्यार्थ्यांच्या वसतिगृह प्रवेशाची यादी प्रसिध्द न झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून सदर प्रवेश प्रक्रिया तातडीने राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाकरीता वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रवेशप्रक्रिया https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर सुरु करण्यात आली आहे.

संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांनी वसतिगृह योजनेंतर्गत प्रवेश प्रक्रियेसाठी वेळापत्रकानुसार बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी दि.०१.०८.२०२५ ते दि.१७.०८.२०२५ व व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी दि.०१.०९.२०२५ ते दि.१८.०९.२०२५ या कालावधीत अर्ज मागविले होते. तथापि, वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी अर्ज करावयाच्या कालावधीमध्ये मुदतवाढ मिळण्याबाबत विद्यार्थ्यांनी केलेली मागणी, वसतिगृह प्रवेशासाठी पुरेसे काही अर्ज प्राप्त न झाल्यामुळे, तसेच काही अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेत

विलंब होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन वसतिगृह प्रवेशप्रक्रियेसाठी वेळोवेळी मुदतवाढ दिली होती.

राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत बिगर व्यावसायिक / व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी अंतिम मुदत दि.२६.१०.२०२५ पर्यंत देण्यात आली होती.

वरील मुदतवाढीनंतर वसतिगृह प्रवेश प्रक्रियेसाठी प्राप्त अर्जाची छाननी दि.०७.११.२०२५ पर्यंत केली आहे. तद्नंतर पात्र विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार संभाव्य पहिली निवड यादी दि.१८.११.२०२५ रोजी जाहीर करण्यात आली आहे. त्यानुषंगाने, पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत आहेत.

-----------------

## गावबीटावट (ता.जामनेर, जि.जळगाव) येथे युवकाची मॉब लिंचिंग करून हत्या करण्यात आल्याबाबत

**(२०) * १६७३२ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गावबीटावट (ता.जामनेर, जि.जळगाव) येथे श्री.सुलेमान खान (वय २१) या युवकाची दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी मॉब लिंचिंग करून हत्या करण्यात आल्यामुळे सदर बाब लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी प्रेम प्रकरणाच्या संशयावरुन श्री.सुलेमान खानला आई-वडिलांसमोर मारहाण केली असून त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर घटनेप्रकरणी तात्काळ, सखोल चौकशी (SIT) करून संबंधितांवर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

दि.११.०८.२०२५ रोजी सुलेमान रहिमखाँ पठाण हा एका हिंदु मुलीस जामनेर येथील ब्रँड कॅफेमध्ये घेऊन गेला व त्या मुलीला प्रेमात ओढण्याचा प्रयत्न करत असल्याचे समजल्याने १०/१२ अनोळखी लोकांनी चिडून त्याला जामनेर येथील ब्रँड कॅफे समोरुन मोटार सायकलवर बसवून जामनेर, सोनबर्डी परिसर, बेटावद येथील शेतात व बस स्टँडवर नेवून लाठया-काठया, लोखंडी रॉड तसेच लाथा बुक्क्यांनी मारहाण केली व त्यास बस स्टँडवर त्याच अवस्थेत सोडून निघून गेले.

तद्नंतर सुलेमान पठाण यास नातेवाईकांनी त्याला सुरुवातीला जामठी व त्यानंतर जामनेर येथील सरकारी दवाखान्यात उपचारास नेले असता डॉक्टरांनी त्यास मयत घोषित केले. सदर घटनेबाबत मयत सुलेमान पठाण याच्या वडीलांच्या फिर्यादीवरुन जामनेर पो.स्टे. येथे CCTNS No. २८८/२०२५, BNS कलम १०३(१), १०३(२), १४०, १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्याचे गांभीर्य व संवेदनशीलता पाहता गुन्ह्याच्या तपासकामी अपर पोलीस अधिक्षक, चाळीसगाव (पर्यवेक्षण अधिकारी) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १४.०८.२०२५ रोजी विशेष तपास पथक (SIT) ची स्थापना करण्यात आलेली आहे.
(४) सदर प्रकरणी उक्त प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याच्या तपास विशेष तपास पथकामार्फत करण्यात आला असून सदर गुन्ह्यात एकूण १० आरोपींना अटक करण्यात आली असून १ आरोपी अद्याप फरार आहे त्याच्या शोध सुरु आहे. गुन्ह्यातील सहभागी आरोपींविरुध्द सबळ पुरावे गोळा करुन ११ आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून सद्यस्थितीत गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील सायबर गुन्ह्याला आळा घालण्याबाबत**

**(२१) * १६४८४ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सायबर गुन्ह्यांसाठी बँक खाती पुरविणाऱ्या टोळीतील १२ गुन्हेगारांना गुन्हे शाखेकडून माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये अटक केली असून या सायबर चोरांनी तब्बल ६० कोटी रुपये वळविल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात माहे जानेवारी ते ऑगस्ट, २०२५ या कालावधीत सायबर गुन्ह्याचे ३५०० पेक्षाही अधिक गुन्हे दाखल झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी अटक केलेल्या आरोपींकडून हस्तगत करण्यात आलेल्या लॅपटॉप आणि इतर साहित्याची तपासणी केली असता टोळीने ९४३ बँक खाती सायबर चोरांना विकली असून त्यापैकी १८१ बँक खात्याचा सायबर गुन्ह्यासाठी वापर करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह राज्यातील वाढत्या सायबर गुन्ह्याला आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सायबर गुन्ह्यासाठी बँक खाती पुरविणाऱ्या टोळीतील १२ गुन्हेगारांना गुन्हे शाखाकडून माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये अटक केली नसून ऑगस्ट, २०२५ मध्ये डी.एस.कन्सलटन्सी व प्रिरीत लॉजिस्टीक्स प्रा.लिमीटेड, कांदिवली, मुंबई या बोगस कंपनीच्या ऑफिसमध्ये मुंबईतील वेगवेगळया बँकामध्ये उघडण्यात आलेल्या नवीन बचत खाते/चालू खात्याचे बँक अकाऊंट पासबुक, चेकबुक व सीम कार्ड आणून तेथे ॲक्टिवेट करुन ते पुन्हा पुढे पाठवित होते. त्यानंतर सदरच्या बँक खाते क्रमांकाचा व सिमकार्डचा ऑनलाईन फसवणूक,बेकायदेशीर बेटींग व गेमींग करीता वापर करीत असल्यासंदर्भात समता नगर पोलीस ठाणे, मुंबई येथे दि.१२.०८.२०२५ रोजी गु.र.क्र.६९४/२०२५ (गु.प्र.शा. गु.र.क्र. ६७/२०२५) भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (४), ३(५) अन्वये १३ व्यक्तींवर गुन्हा नोंद करून अटक करण्यात आली. सद्यस्थितीत सदर

गुन्ह्यातील ९ आरोपी न्यायालयीन कोठडीत असून ४ आरोपी जामीनावर आहेत. तसेच सदर गुन्ह्यातील आरोपींवर मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.
(२) होय.
(३) व (४) नमूद गुन्ह्यात घटनास्थळी मिळून आलेल्या लॅपटॉप मधून घेण्यात आलेल्या डाटाचे सायबर नियंत्रण कक्ष हेल्पलाईन क्र. १९३० यांचे व्दारे विश्लेषण केले असता, त्यामधून सदर गुन्ह्यामध्ये एकूण ९३४ बॅंक अकाऊंट वापरण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून त्यापैकी सायबर फ्रॉडसाठी वापरण्यात आलेली १६९ बॅंक खाते डेबीट फ्रिज करण्यात आले आहेत.

राज्य शासनाने सायबर फसवणुकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधुनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प राबविण्यासाठी दि.२७.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर सायबर सुरक्षा प्रकल्पाचे उद्घाटन महापे, नवी मुंबई येथील इमारती मध्ये करण्यात आले आहे. सदर प्रकल्प राज्यातील सायबर सुरक्षा आणि सायबर गुन्हे नियंत्रणासाठी हा एक अत्याधुनिक केंद्रबिंदू ठरेल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) महापालिका क्षेत्रातील बांधकाम गैरव्यवहाराबाबत

**(२२)** * **१७७७७ श्री.महेश सावंत (माहिम), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार (जि.पालघर) महापालिका क्षेत्रातील बांधकाम गैरव्यवहार प्रकरणी तत्कालिन आयुक्त श्री.अनिलकुमार पवार व इतर १८ अधिकारी व संबंधितांना दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी त्यांना अटक केल्यानंतर त्यांच्याविरुध्द मिरा-भाईंदर पोलिस आयुक्त कार्यालयामार्फत दाखल करण्यात आलेल्या विविध गुन्हयांच्या आधारे त्यांच्या निवासस्थानी छापा टाकण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी आलोसे, तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक, वसई-विरार शहर महानगरपालिका हे जयेश मेहता व इतर (ECIR/MBZO-II/१०/२०२५) या प्रकरणात हवाला (Money laundering) प्रकरणी दोषी आढळून आले असल्याने त्यांना सक्तवसुली संचालनालय (Directorate of Enforcement), मुंबई विभाग यांनी दिनांक १३.०८.२०२५ रोजी Prevention of Money Laundering, २००२ मधील कलम १९ अंतर्गत अटक करण्यात आली आहे, ही बाब खरी आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) I. प्रस्तुत प्रकरणी वसई-विरार (जि.पालघर) महापालिका क्षेत्रातील बांधकाम गैरव्यवहारासंदर्भात तुळींज पोलिस ठाणे येथे गु.र.क्र. १३४८/२०१९, अचोळे पोलीस ठाणे येथील गु.र.क्र.१९५/२०२२, गु.र.क्र.

१९६/२०२२ व गु.र.क्र.६९/२०२३ दाखल झालेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने सक्तवसुली संचालनालयाने आलोसे, तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक, वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्याविरुद्ध Prevention of Money Laundering Act २००२ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

II. आलोसे हे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी असल्याने त्यांचे अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) १९६९ मधील नियम ३ (२) मधील तरतुदीनुसार दिनांक २६.०८.२०२५ रोजीच्या आदेशान्वये अटकेच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक १३.०८.२०२५ पासून मानीव निलंबन करण्यात आले आहे.

III. आलोसे यांच्याविरुद्ध सक्तवसुली संचालनालयाने सुरु केलेल्या फौजदारी कार्यवाहीच्या अनुषंगाने त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यासंदर्भातील बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील भांडूप (पश्चिम) येथील एल.बी.एस रोडवर तरुणाचा विजेच्या तारांचा धक्का लागून मृत्यू झाल्याबाबत

**(२३) * १८१५१ श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मुंबईतील भांडूप (पश्चिम) येथील एल.बी.एस रोडवरील पन्नालाल कंपाऊंड या ठिकाणी विजेच्या तारा उघड्याच ठेवल्यामुळे पावसाळ्यात साचलेल्या पाण्यात वीजप्रवाह प्रवाहित झाल्यामुळे रस्त्यावरून चालताना विजेचा धक्का लागून १७ वर्षीय तरुण श्री.दीपक पिल्ले याचा जागीच मृत्यू झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच भांडूप, मुलुंड, नाहूर येथील मोकळ्या जागेत व शाळेच्या अवतीभवती व लोकवस्तीच्या ठिकाणी विजेच्या तारा लोंबकळत असून काही ठिकाणच्या वीज वाहिन्या नादुरुस्त व जीर्ण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी पाण्यात विद्युतप्रवाह प्रवाहित होत असल्याने तेथील नागरिकांनी संबंधित विभागाकडे तक्रारी केल्यानंतरही तेथे कोणतीही दुरुस्ती वा उपाययोजना केली नसल्याने तरुणाचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी व तरुणाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

मुंबईतील भांडूप (प.), एल.बी.एस. रोडवरील पन्नालाल कंपाऊंड, नॉव्हेल्टी स्टेशनरी दुकानासमोर वीजेच्या तारा उघड्या नसून सदर ठिकाणी इन्सुलेटेड केबल आहेत. एका इन्सुलेटेड केबलमध्ये दोष निर्माण होऊन पावसाळयात साचलेल्या पाण्यात वीज प्रवाहित होऊन रस्त्यावर साठलेल्या पाण्यातून चालताना वीजेचा धक्का लागून १७ वर्षीय तरुण श्री.दीपक पिल्ले यांना वीजेचा धक्का लागून दि.१९.०८.२०२५ त्यांचा प्राणांतिक अपघात झाला.

(२) हे खरे नाही,

भांडूप, मुलुंड, नाहूर येथील विद्युत वाहिन्या हया प्रामुख्याने भूमिगत स्वरुपाच्या असून, अल्पशः प्रमाणात ओव्हरहेड आहेत. विद्युत यंत्रणेचा वेळोवेळी योग्य ती देखभाल व दुरुस्ती महावितरणकडून त्वरीत करण्यात येते.

(३) हे अंशतः खरे आहे.

सदर ठिकाणी नागरिकांनी केलेल्या Online तक्रारीमध्ये पावसामुळे साचलेल्या पाण्यात विद्युत प्रवाह प्रवाहित होत असल्याचे किंवा अपघाताचा उल्लेख नव्हता. सदर तक्रार ही पावर फेल्युअर या श्रेणीमधील असून डीटेल्स मध्ये " Line Snapped (Pole to Pole meter wire is sparking)" अशी होती. सदर दिवशी अतिवृष्टी असल्याकारणाने संबंधित विभागाचे कर्मचारी यापुर्वी आलेल्या विविध तक्रारीचे निवारण करण्यात व्यस्त होते. तक्रार मिळाल्यानंतर संबंधित विभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहचेपर्यंत सदर अपघात झाला होता. घटनास्थळी पोहचल्यानंतर कर्मचाऱ्यांनी वीजपुरवठा खंडीत करुन दोषयुक्त केबल आयसोलेट करुन पाण्यात विद्युत प्रवाह होत नाही, याची खात्री केली व नंतर वीजपुरवठा पुन्हा सुरळीत केला.

(४) विद्युत निरीक्षक, निरिक्षण विभाग, ठाणे क्र.१ यांनी दि.२०.०८.२०२५ रोजी सदर विद्युत अपघाताची चौकशी केली असून, त्यांचेमार्फत अशाप्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, पन्नालाल उपविभाग, यांना आवश्यक विद्युत दुरुस्ती करण्याबाबत ज्ञापन देण्यात आले होते त्यानुसार अतिरिक्त कार्यकारी अभियंता, पन्नालाल उपविभाग, यांनी दि.१६.०९.२०२५ रोजीच्या पत्रानुसार सदर ठिकाणी नवीन केबल टाकण्यात आले असून, सदर ठिकाणच्या केबल भूमिगत करण्यात आल्या असल्याचे व आवश्यक विद्युत दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच, सदर घटनेतील अपघातग्रस्त श्री. दिपक पिल्ले यांच्या कुटुंबियांना शासन नियमानुसार रु.४,००,०००/- ची नुकसान भरपाई देण्यात आली आहे. तसेच, अधिक्षक अभियंता, महावितरण ठाणे नागरी मंडळ तर्फे वरील अपघाताच्या बाबतीत चौकशी समिती गठित केली असुन त्याबाबत चौकशी चालु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील चोवीसवाडी येथील सोसायटीमध्ये मुलाचा उद्वाहन अपघातामुळे झालेला मृत्यू

**(२४)** * **१८०१९ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील चोवीसवाडी येथील रामस्मृती सोसायटीमध्ये बारा वर्षांच्या कु.अमेय फडतरे या मुलाचा उद्वाहन दवाहन (लिफ्ट) अपघातामुळे दिनांक २ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शहरातील गृहनिर्माण प्रकल्प व व्यावसायिक आस्थापनामधील उदवाहन (लिफ्ट) चे उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार नियमित तपासणी न केल्यामुळे सदर अपघात घडला असून, शहरातील सर्व गृहनिर्माण सोसायटी मधील उद्वाहनाचे (लिफ्ट) सुरक्षा सेफ्टी ऑडिट करून निकृष्ट व अप्रमाणित लिफ्ट त्वरित बंद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग व मा.अधीक्षक अभियंता, उद्योग, ऊर्जा अधिकाऱ्यांकडे लेखी पत्राद्वारे दिनांक ०३ ऑक्टोबर २०२५ रोजी वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शहरातील गृहनिर्माण प्रकल्पातील निकृष्ट दर्जाचे व अप्रमाणित उदवाहन (लिफ्ट) त्वरित बंद करून शासनाच्या नियमावलीनुसार कारवाई करून नियमाचे पालन न करणाऱ्या बिल्डर, विकासक व सोसायटी व्यवस्थापनावर कोणती कठोर दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर प्रकरणी घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व गृहनिर्माण प्रकल्प व व्यावसायिक आस्थापनावरील उदवाहनाचे (लिफ्ट) सुरक्षा ऑडिट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) श्री. शंकर जगताप, मा.विधानसभा सदस्य यांच्या पत्राच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता (विद्युत) पुणे यांच्या दि.०३/११/२०२५ च्या पत्रान्वये गृहप्रकल्पातील उद्वाहनांच्या सुरक्षा तपासणीसंदर्भातील वस्तुस्थिती त्यांना अवगत करण्यात आली आहे.

(३) उक्त प्रकरणी दि.०३/१०/२०२५ रोजी चौकशी करण्यात आलेली आहे. अपघातानंतर सदर उद्वाहन बंद करण्यात आले असून आवश्यक त्या त्रुटी/ दुरूस्ती करण्याबाबत विद्युत निरीक्षक, पुणे यांनी पत्र क्र. ४५६२/ दि.०८.१०.२०२५ रोजी गृहनिर्माण संस्थेस ज्ञापन दिले असून त्रुटी पुर्तता झाल्यानंतर लेखी परवानगी घेवून उद्वाहन वापर चालू करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) महाराष्ट्र उद्वाहन कायदा १९३९ मधील कलम ११ नुसार उद्वाहनांची नियमित नियतकालिक निरीक्षणे केली जातात. पुणे जिल्ह्यामध्ये एकूण ६१५२१ उद्वाहने असून माहे जुलै २०२५ ते माहे नोव्हेंबर २०२५ या कालावधीमध्ये ५६९४ उद्वाहनांची नियतकालिक निरीक्षणे पूर्ण झाली असून उर्वरित नियतकालिक निरीक्षणे करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यापूर्वी उद्वाहनाच्या कामकाजाकरिता २ विद्युत निरीक्षक (उद्वाहन) व इतर ६९ तांत्रिक पदे मंजूर होती. अधिकाधिक उद्वाहनांचे वार्षिक निरीक्षण करण्यासाठी जास्तीचे मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासन अधिसूचना दि.२८.०४.२०२५ अन्वये उद्वाहनविषयक कामकाजाचे विभाग/ जिल्हास्तरावर विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. यामुळे एकूण ५१९ इतकी मंजूर पदे उपलब्ध झालेली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) शहरातील अनेक ठिकाणी उघड्या ट्रान्सफार्मर व डी.पी.मुळे शॉर्टसर्किट होऊन झालेला अपघात

**(२५) * १६७९५ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) येथील सोपारा गावातील डांगेवाडी परिसरात ट्रान्सफार्मरला अचानक लागलेल्या भीषण आगीत ६ वर्षांच्या मुलीचा मृत्यू व एकजण गंभीर जखमी होऊन मुक्या जनावरांचाही मृत्यू झाल्याची घटना दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार शहरात रस्त्याच्या कडेला, गल्ल्यांमध्ये, उघडया मैदानात, सोसायटयांच्या आवारात असलेले विजेचे उघडे डी.पी.बॉक्स व ट्रान्सफार्मरकडे महावितरण कंपनीने दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२४ पासून उक्त शहरातील डी.पी. व ट्रान्सफार्मर बंदिस्त करण्यासाठी नागरिकांकडून केलेल्या मागणीकडे सबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे अशा घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दुर्घटनेस जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासह अशा प्रकारच्या दुर्घटना घडू नये याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वसई-विरार (जि.पालघर) अंतर्गत नालासोपारा पश्चिम येथील सोपारा गावातील डांगेवाडी परिसरात दि.२२.०९.२०२५ रोजी सायंकाळी ०७.५० च्या दरम्यान रोहित्राची टाकी खालच्या बाजूस फुटून त्यातील गरम ऑईल बाहेर फेकले गेले. त्यावेळी रोहित्र वितरण केंद्राजवळून जात असलेल्या नसरीन परविन व जवळ असलेले जावेद अन्सारी यांच्या अंगावर हे गरम ऑईल पडल्याने ते भाजले गेल्याने, उपचारादरम्यान त्यांचा दुर्देवी मृत्यु झाला.
(२) व (३) हे खरे नाही.

महावितरण कंपनीमार्फत ग्राहकांच्या सुरक्षिततेला नेहमीच प्राधान्य देण्यात येत असून, वसई मंडळ कार्यालयाव्दारे विदयुत संच मांडणीचे नियमित सर्वेक्षण करुन वर्ष २०२४-२५ मध्ये निविदा प्रक्रियेव्दारे नेमणूक केलेले कंत्राटदार तसेच सूचिबध्द कंत्राटदारामार्फत एकूण ३६४९ मिनी पिलर, फिडर पिलर/डिस्ट्रीब्यूशन बॉक्स च्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दरवाजे दुरुस्ती तथा बदली करणे उंची वाढविणे इत्यादी कामे करण्यात आलेली आहेत. तसेच वर्ष २०२५-२६ मध्ये आज पर्यंत एकूण २९४ मिनी पिलर/ फिडर पिलर/ डिस्ट्रीब्युशन बॉक्स चे सुरक्षिततेच्या दृष्टीने दरवाजे दुरुस्ती तथा बदली करणे / उंची वाढविणे इत्यादी कामे करण्यात आलेली असून, उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक तथा रहदारी असलेल्या ठिकाणच्या विदयुत रोहित्रांना सुरक्षा जाळे व पत्रे बसविण्याचे कारवाई महावितरण तर्फे राबविण्यात येते. वर्ष २०२५-२६ करिता निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार विरार विभागाअंतर्गत एकूण ६१ रोहित्रांचे व वसई विभाग अंतर्गत ४० रोहित्रांच्या अशा एकूण १०१ रोहित्रांना सुरक्षा जाळे व पत्रे बसविण्याची कामे प्रगतीपथावर आहे. विरार विभागाअंतर्गत १८ विदयुत रोहित्रांना सुरक्षा जाळे व पत्रे बसविण्याची कारवाई पूर्ण झालेली आहे.
(४) सदर प्रकरणी विदयुत निरिक्षण विभाग, पालघर यांनी चौकशी करुन दि.०९.१०.२०२५ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार दि.२२.०९.२०२५ रोजी रात्री ०७.५० वा. च्या सुमारास रोहित्रामधील इन्सुलेटींग ऑईलचे आद्रतेचे प्रमाण वाढल्यामुळे इन्सुलेशन फेल्यूअर झाले व त्यामुळे रोहित्रामधील ऑईलचे तापमान वाढून उच्चदाब निर्माण झाला व रोहित्राचे एक्सप्लोझन वेंट कार्यान्वीत न झाल्यामुळे रोहित्राची टाको खालील बाजूस फुटून गरम ऑईल बाहेर फेकले गेले. त्यावर महावितरण कंपनीने सदर रोहित्राची क्षमता वाढवून ३१५ केव्हीए ऐवजी ६३० केव्हीए ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले असून, त्यास सुरक्षा जाळे व पत्रे बसविण्यात आली आहेत. वसई मंडळाअंतर्गत एकूण १०१ ठिकाणी रोहित्रांना सुरक्षा जाळी/ पत्रे लावण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच, प्राणांतिक अपघात झालेले नसरीन परविन व जावेद अन्सारी यांच्या वारसांना महावितरण कंपनीच्या नियमानुसार रु.८.०० लाख (प्रत्येकी रुपये ४.०० लाख) अशी नुकसान भरपाई दि. २६.११.२०२५ रोजी देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली, कोल्हापूर व मुंबई येथे बनावट नोटा जप्त केल्याबाबत

**(२६) * १५८४७ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरज (जि.सांगली) तालुक्यातील निलजी-बामणी रोडवरील पुलाजवळ एक कोटी रूपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्याचे तसेच कोल्हापूर जिल्ह्यात बनावट नोटा तयार करण्याचा कारखाना सापडला असल्याचे दिनांक १९ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील विक्रोळी (पूर्व) येथे खऱ्या चलनी नोटांच्या बदल्यात तिप्पट नोटा देण्याचे अमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या चार जणांच्या टोळीला गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान प्रत्यक्ष पकडले असून केलेल्या कारवाईत पोलीसांनी तब्बल रु.६ लाख, ३३ हजार ७२५ इतका मुद्देमाल जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विशेषत: सांगली, कोल्हापूर व मुंबई येथे बनावट नोटा चलनात आणण्यासाठी मोठे रॅकेट कार्यरत असल्याने आर्थिक व्यवहार, बाजारपेठेतील व्यापाऱ्यांकडे बनावट नोटा आल्यास बँकींग व्यवस्थेमध्ये अराजकता निर्माण होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह बनावट नोटा तयार करणाऱ्या टोळ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

मिरज जि.सांगली येथील महात्मा गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीतील निलजी बामणी रोडवर कोल्हापुर हायवेच्या ब्रीजच्या खाली दि. ०८.१०.२०२५ रोजी बनावट नोटा जप्त करण्यात आल्या असुन कोल्हापुर येथील वेदमहाभारत अपार्टमेंट मधील सिध्दी लक्ष्मी अमृततुल्य चहा नावाच्या फर्मच्या ऑफिसमध्ये सदरच्या नोटा तयार केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरणी महात्मा गांधी चौक पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२५६/२०२५, भा.न्या.सं. कलम १७८, १७९, १८०, १८१, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरच्या गुन्ह्यात एकुण ८ आरोपींना अटक करण्यात आली असुन गुन्ह्याच्या तपासात एकुण १,०५,८७,४००/-रुपये किंमतीच्या बनावट नोटा तसेच ११,८०,६०० रुपये किंमतीचे साहीत्य व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच कोल्हापूर जिल्ह्यात बनावट नोटा तयार करण्याचा कारखाना दि.१९ ऑक्टोबर, २०२५ रोजी सापडला असल्याचे निदर्शनास आल्याबाबत पोलीस अधिक्षक, कोल्हापुर यांच्या अभिलेख्यावर माहिती उपलब्ध नसल्याचे पोलीस अधिक्षक, कोल्हापुर यांनी कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

दि.११.०८.२०२५ रोजी विक्रोळी पुर्व, मुंबई येथे सदरच्या गुन्ह्यातील एकुण चार आरोपींनी आपसात संगणमत व कट रचुन सदर गुन्ह्यातील फिर्यादीला रु.२५,०००/- च्या बदल्यात रोख रु.१,००,०००/- देतो असे सांगुन फिर्यादी यांना मुलांच्या खेळण्यातील नोटांचे दोन बंडल देवुन त्यांची फसवणुक केल्याप्रकरणी गु.प्र.शा.गु.नों.क्र.६५/२०२५, भा.न्या.सं. कलम ३१८(४), ६१, ३(५) (विक्रोळी पो.स्टे. गुन्हा नोंद क्र.४६२/ २०२५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी एकुण चार आरोपींना दि. १२.०८.२०२५ रोजी अटक करण्यात आली असून सदरच्या गुन्हे तपासात अटक आरोपींकडुन एकुण ६,३५,७२५/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सद्यस्थितीत चारही आरोपी जामिनावर मुक्त असुन आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदरचा गुन्हा सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी उक्त प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले असुन संबंधित आरोपींना अटक करुन मुद्देमाल व इतर साहीत्य जप्त करुन त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच बनावट नोटांबाबत होत असलेल्या फसवणुकी संदर्भात नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. बनावट नोटा तयार करुन जनतेची आर्थिकदृष्टया फसवणुक करणाऱ्या आरोपींविरुध्द गोपनियरित्या आगाऊ माहिती प्राप्त करुन आरोपींवर योग्य कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राजपत्रित गट-ब सेवा संयुक्त (मुख्य) परिक्षा २०२४ परिक्षेतील प्रश्नपत्रिकेत चुका आढळून आल्याबाबत**

**(२७) * १५८७६ श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) राज्य गट-ब (अराजपत्रित) सेवा, संयुक्त (मुख्य) परीक्षा-२०२४ च्या अंतिम उत्तरतालिकेत एकूण १२ प्रश्न रद्द आणि २ प्रश्नांमध्ये बदल केल्यामुळे विद्यार्थ्यांचे २८ गुणांचे नुकसान होणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षेतील प्रश्नपत्रिकेमधील वारंवार होणाऱ्या चुका व प्रश्न रद्द होण्यामुळे उमेदवारांच्या भवितव्यावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही प्रश्न चुकल्याने ते रद्द करण्याशिवाय आयोगाकडे पर्याय नसल्याने तसे करावे लागले असा खुलासा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून माध्यमांसमोर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी प्रश्नपत्रिकेत झालेल्या चुकांसंदर्भात जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करणेसह विद्यार्थ्यांना गुणांची भरपाई करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच या घटनेची शासनाने चौकशी करुन अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे अंशत:खरे आहे.

महाराष्ट्र राजपत्रित गट-ब सेवा, संयुक्त (मुख्य) परीक्षा-२०२४ या परीक्षेच्या दोन्ही प्रश्नपत्रिकांच्या प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या. सदर परीक्षेच्या प्रश्नासंदर्भात उमेदवारांनी नोंदविलेल्या आक्षेपांवर संबंधित विषयाच्या / घटकाच्या मूळ तज्ञांचे अभिप्राय विचारात घेवून पेपर क्र.१ मधील ५ प्रश्न रद्द व २ प्रश्नांचे पर्याय बदल आणि पेपर क्र.२ मधील ७ प्रश्न रद्द असे एकूण १२ प्रश्न रद्द व २ प्रश्नांचे पर्याय बदल करुन अंतिम उत्तरतालिका आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली.

आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतूदीनुसार आयोगाने रद्द केलेल्या १२ प्रश्नांसाठी कोणत्याही उमेदवाराला गुण देण्यात आले नसल्याने उमेदवारांचे नुकसान झालेले नाही.

(४) व (५) महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही एक सांविधानिक संस्था असून आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे कामकाज आयोगाने निश्चित केलेल्या कार्यनियमावलीतील तरतूदींनुसार करण्यात येते.

आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी प्रश्नपत्रिका तयार करण्याचे काम संबंधित विषयातील तज्ञांकडून करुन घेण्यात येत असून त्यामध्ये आयोगातील अधिकारी/कर्मचारी यांचा कोणताही हस्तक्षेप नसतो.

आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांमध्ये प्रश्न रद्द होणे व प्रश्नांच्या उत्तराचे पर्याय बदल होणे याचे प्रमाण कमी करण्याकरिता आयोगामार्फत अंतर्गत गोपनीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशींनुसार आवश्यक उपाययोजना आयोगाच्या स्तरावर करण्यात येत आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे सोनगीर (ता.जि.धुळे) येथे लहान मुलीवर झालेल्या लैगिक अत्याचाराबाबत

**(२८) * २०४५४ श्री.राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सोनगीर (ता.जि.धुळे) येथे तीन वर्षांच्या लहान मुलीवर तिच्या चुलत काकाने बलात्कार केल्याची घटना घडल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेमुळे तालुक्यात गुन्हेगाराविरोधात संतापाची लाट पसरली असून गुन्हेगाराला कठोरातील कठोर शिक्षा व्हावी अशी नागरिकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदर घटनेतील आरोपीला फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणी चालवून लवकरात लवकर कठोरातील कठोर शिक्षा करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी (धुळे ग्रामीण) यांनी दिनांक २ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे, खरे आहे.
(४) सदर प्रकरणी सोनगीर पो.स्टे. येथे गु.र.नं. २९५/२०२५ भा.न्या.सं., २०२३ चे कलम ६४ (२) (एफ), ६५(२) सह लैंगिक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ५ (एम) (एन), ६, ९ (एम) (एन), १० प्रमाणे दि.०१/१०/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील राज्य विदयुत वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता व सहायक लेखापाल यांनी केलेला गैरव्यवहार

**(२९) * १९९८८ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील राज्य विदयुत वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता, श्री.प्रकाश मालखेडे व सहायक लेखापाल, श्री.आदित्य जोशी यांनी कर्तव्यात असताना तालुक्यात अनेक ठिकाणी धाडी टाकून कुठलीही शहानिशा न करता रिडींगकामी आपल्या मर्जीतील कंत्राटदार यांच्याशी अर्थपूर्ण /संगनमत करुन अव्वाच्या सव्वा देयके आकारली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ग्राहकांवर खोट्या केसेस करणे, ग्राहकांशी अरेरावी करणे, कर्तव्यात असताना कार्यालयात वेळेवर उपस्थित न राहणे, लोकप्रतिनिधी यांचेशी उद्धटपणे वागणे, लोकांच्या कामाकरिता लोकप्रतिनिधींनी संपर्क साधला असता त्यांना दुरध्वनीवरुन समाधानकारक उत्तरे न देणे, वाढीव देयके काढणे आदी तक्रारी असतानादेखील अद्यापपर्यंत त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

महावितरण कंपनीच्या कार्याचा भाग म्हणून श्री. मालखेडे, उपकार्यकारी अभियंता व श्री. आदित्य जोशी, सहाय्यक अभियंता यांच्या कार्यकाळात शहापूर तालुक्यात अनेक ठिकाणी अशा वीज चोरी शोध मोहिमा राबविण्यात आलेल्या होत्या व वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांवर कंपनीच्या नियमानुसार दंडात्मक कारवाया करण्यात आल्या आहेत.

तसेच श्री.प्रकाश मालखेडे, उपकार्यकारी अभियंता यांचा शहापूर उपविभाग येथील कार्यकाळ दि.०५/०८/२०२३ ते दि.०५/०८/२०२४ पर्यंत होता. श्री.आदित्य घनश्याम जोशी, सहाय्यक अभियंता यांचा शहापूर शहर कक्ष येथील कार्यकाळ हा दि.१२/०८/२०२१ ते दि.१६/०६/२०२५ पर्यंत होता.

त्या कालावधीत वीजचोरी मोहिमेबाबत श्री.प्रकाश मालखेडे, उपकार्यकारी अभियंता व श्री.आदित्य जोशी, सहाय्यक अभियंता यांच्याकडून कुठल्याही प्रकारची अनियमितता झाल्याचे आढळुन आलेले नाही तसेच त्यांच्याविरुध्द कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वरळी येथील पोलीस वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबत

**(३०) * २०५७३ श्री.आदित्य ठाकरे (वरळी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.महेश सावंत (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वरळी येथील पोलीस वसाहतीमधील निवासी इमारती अत्यंत जीर्णावस्थेत असल्याने उक्त ठिकाणी अपघात होवून जिवीतहानी होण्याची स्थिती निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसाहतीमधील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सुरक्षित व सुसज्ज निवासासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व पोलीस कर्मचारी यांनी सदरहू वसाहतीचा पुनर्विकास करण्यासाठी मा.मुख्यमंत्री व संबंधित विभागाकडे मागणी करुनही अद्यापही त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच पोलीस कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर, विभागाकडून रु.१५० प्रती चौ.फुट इतकी दंडनीय अनुज्ञप्ती शुल्क आकारण्यात येत असल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी उक्त रक्कम कमी करण्यासाठी वेळोवेळी निवेदन देवूनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने वरळी येथील पोलीस वसाहतीचा पुनर्विकास तातडीने सुरू करुन सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांकडून आकारण्यात येणारी दंडनीय अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम कमी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) वरळी पुनर्विकास प्रकल्प महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत हाती घेण्यात आला असून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

(३) शासन निर्णय, गृह विभाग, दि.१८/११/२००५ नुसार शासकीय निवासस्थानास मुदतवाढ व दंडनीय शुल्क आकारण्याची तरतूद आहे. त्यानुसार मुदतवाढ व दंडनीय शुल्क माफी देण्यात येते. तथापि, राज्यात पोलीस दलामध्ये कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी/ अंमलदार यांची संख्या पहाता शासकीय निवासस्थाने अपुरी पडत आहे. तसेच विहीत मुदतवाढ दिल्यानंतर ही निवासस्थान रिकामे न झाल्याने, विविध पोलीस घटकात कार्यरत असणाऱ्या प्रतिक्षा यादीतील गरजू अधिकारी/ कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थानापासून वर्षानुवर्षे वंचित राहावे लागत आहे. यामुळे कार्यरत ठिकाणाजवळ शासकिय निवासस्थान उपलब्ध न झाल्याने कर्मचारी/ अधिकारी यांना कार्यक्षमपणे व तत्परतेने कामकाज पार पाडणे शक्य होत नाही. यामुळे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.शानिवा-२५१७/प्र.क.३३/२३-अ, दि.३०/०८/२०१८ अन्वये दंडनीय शुल्क दर प्रती चौ.फू.प्रती माह रुपये १५०/- याप्रमाणे विहीत केल्याप्रमाणे दंडनीय शुल्क आकारण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) वर नमूद (२) व (३) प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### महावितरण कंपनीने इंधन समायोजन शुल्क लागू केल्याने वीजेच्या दरात झालेली वाढ

**(३१) * १६१४० श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाच्या "संयुक्त कुसुम घटक ब" योजनेन्वये माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये महावितरणने इंधन समायोजन शुल्कात (Fuel Adjustment Charge-FAC) प्रती युनिट ३५ ते ९४ पैशांपर्यंत वाढ केल्यामुळे १०१ ते ३०० युनिट वापरणाऱ्या ग्राहकांना प्रती युनिट ६५ पैसे, तर ३०१ ते ५०० युनिट वापरणाऱ्यांना ७५ पैसे आणि ५०० युनिटपेक्षा जास्त वापरणाऱ्यांना ९४ पैसे जादा शुल्क भरावे लागल्याने घरगुती ग्राहक, उद्योजक आणि छोट्या व्यापाऱ्यांच्या वीज देयकात मोठी वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील लोखंड, पोलाद व प्लास्टिक उद्योगामध्ये वीज दरवाढीमुळे त्रस्त होऊन राज्यातील उद्योग इतर राज्यात जाण्याच्या तयारीत असल्याचे निदर्शनास आले असून इलेक्ट्रीक वाहन चार्जिंगमध्ये या दरवाढीमुळे महागणार असून याचा परिणाम थेट इलेक्ट्रीक वाहनांच्या धोरणावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इंधन समायोजन शुल्क वाढविण्यामागे वीज खरेदीचा खर्च वाढणे हे कारण दिले गेले असून सदर खर्च नेमका किती वाढला आहे आणि त्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी महावितरणने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्याच्या अर्थव्यवस्थेवर तसेच जनतेच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारी वीज दरवाढ (इंधन समायोजन शुल्क) कमी करुन वीज ग्राहक, छोटे व्यापारी व उद्योजकांना माफक दरात वीज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे,

माहे-ऑगस्ट २०२५ मध्ये वीज खरेदी खर्च सरासरी रु.०.४२ प्रति युनिट इतका वाढल्याकारणाने ऑक्टोबर २०२५ मध्ये ग्राहकांच्या वीज बिलामधील इंधन समायोजन शुल्कात वाढ करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मा. वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या सरासरी वीज खरेदी दरापेक्षा प्रत्यक्षात वीज खरेदीचा सरासरी दर अधिक झाल्यास अशा अधिकच्या वाढीव खर्चाची वसुली इंधन समायोजन आकारच्या (FAC) माध्यमातून करण्यात येते. इंधन समायोजन आकार वसूल करण्याबाबत मा.वीज नियामक आयोगाच्या बहुवार्षिक वीज दर विनियम (MYT रेग्युलेशन) मध्ये तरतूद आहे.

सदर तरतुदीनुसार प्रत्येक महिन्यात प्रत्यक्षात झालेला वीज खरेदी खर्च विचारात घेवून इंधन समायोजन आकाराची परिगणना करण्यात येते. दर महिन्यात प्रत्यक्षात वीज खरेदी खर्च परिस्थितीनुसार वेगवेगळा असल्यामुळे मंजूर वीज खरेदी खर्च व प्रत्यक्षात होणारा वीज खरेदी खर्च यामधील फरकाची रक्कम वेगवेगळी असते, परिणामी दर महिन्यात निर्धारित होणारा इंधन समायोजन आकारही वेगवेगळा असतो. सदर आकार हा मा. वीज नियामक आयोगाच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधीन आहे.

ऑगस्ट २०२५ महिन्यातील वीज खरेदी खर्च हा मा.वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या खर्चापेक्षा एकूण ५४४ कोटी रुपयांनी अधिक झाला आहे. त्यामुळे ऑक्टोबर २०२५ मध्ये ग्राहकांच्या वीज बिलामध्ये सरासरी ०.४२ पैसे प्रति युनिट इंधन समायोजन शुल्कात वाढ करण्यात आलेली आहे. तसेच, वीज खरेदी खर्चात बचत झाल्यामुळे, जुलै २०२५ मध्ये ग्राहकांच्या वीज बिलामध्ये सरासरी ०.३३ पैसे प्रति युनिट इंधन समायोजन शुल्काअंतर्गत परतावा देण्यात आलेला आहे.

एप्रिल-२५ ते सप्टेंबर-२५ ह्या कालावधीत महावितरणने एकूण रु.५०४ कोटी इतका इंधन समायोजन आकार सर्व ग्राहकांना लागू केला आहे. सदर रक्कम ही महावितरणच्या सदर कालावधीतील एकूण वीज खरेदी खर्चापैकी केवळ १% इतकी आहे. तसेच, सदर आकार हा विविध अनपेक्षित वीज खरेदी खर्चामुळे लागू करण्यात आला आहे.

(४) वीज खरेदी खर्च कमी करण्यासाठी महावितरण कंपनीमार्फत स्वस्त दरात उपलब्ध होणाऱ्या अपारंपारिक ऊर्जा (प्रामुख्याने सौर ऊर्जा) सोबत करार करून वीज खरेदी करण्यात येते. तसेच, MOD तत्वानुसार औष्णिक वीज केंद्रामधून वीज खरेदी करणे, कमी मागणीच्या काळात औष्णिक वीज निर्मिती संचास झीरो शेडयूल देणे, गरजेनुसार लघुकालीन वीज खरेदी, पॉवर एक्सचेंज मधून कमी दराने वीज खरेदी करुन चालू असलेले विद्युत संच तांत्रिक किमान मर्यादा बाबींवर (Technical Minimum) वर चालविणे, इत्यादी उपाययोजना महावितरण कंपनीमार्फत राबविण्यात येत असतात. महावितरण कंपनी ग्राहकांना किफायतशीर दरात दर्जेदार आणि अविरत वीज सेवा पुरवण्यासाठी कटिबद्ध आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डोंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील "ग्रोथअप इंडिया" आणि "अर्थयुक्ती कन्सल्टींग" या संस्थांमार्फत कोट्यवधी रुपयांची झालेली फसवणूक**

**(३२) * १९३६३ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील "ग्रोथअप इंडिया" आणि "अर्थयुक्ती कन्सल्टींग" या संस्थांमार्फत अनेक सामान्य गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात मुख्य आरोपी श्री.अनिकेत मुझुमदार यास मा.न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारूनही त्यास अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी आरोपीला अटक न करण्यामागे स्थानिक पोलीस यंत्रणेतील काही अधिकाऱ्यांचा समावेश असल्याने लोकप्रतिनिधी यांनी पोलीस आयुक्त, ठाणे यांना माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निवेदन देऊन चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रकरणाचा तपास पारदर्शकतेने व निष्पक्षतेने पार पाडण्यासाठी त्याची जबाबदारी स्वतंत्र विशेष तपास पथकाकडे (SIT) सोपविण्यासह आर्थिक नुकसान झालेल्या गुंतवणूकदारांची रक्कम परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ग्रोथअप इंडिया आणि अर्थयुक्ती कन्सल्टींग या संस्थांनी दरमहा १० टक्के परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची एकूण २ कोटी ९३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे.

(२) सदर प्रकरणी डोंबवली पोलीस ठाणे येथे गु. र.क्र. २६५/२०२५ भारतीय न्याय संहिता चे कलम ३१८ (४), ३१६ (२), ३१६ (५), ३ (५) सह एमपीआयडी १९९९ चे कलम ३ व ४ अन्वये दि. ०२.०४.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी नामे अनिकेत मुझुमदार हा मिळून आलेला नसून त्याचा कशोशिने शोध सुरु आहे. सदर आरोपीने मा.उच्च न्यायालय मुंबई येथे अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) सदर प्रकरणी कोणत्याही लोकप्रतिनिधी यांनी निवेदन दिलेले नाही. गुन्ह्यातील फिर्यादी मोहन सावंत यांनी वरिष्ठ कार्यालयात अर्ज केला असता फिर्यादी यांना पोलीस ठाण्यात समक्ष बोलावून झालेल्या तपासाबाबत सर्व माहिती दिली आहे. त्याबाबत फिर्यादीचे समाधान झाले आहे. आरोपी अटक न करण्यामागे कोणत्याही स्थानिक अधिकाऱ्याचा समावेश नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी दोन मुख्य आरोपींना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत करण्याच्या अनुषंगाने आरोपींच्या संपत्तीचा शोध घेवून एमपीआयडी कायद्याअंतर्गत संपत्ती जप्त करण्याबाबत पुढील कार्यवाही/तपास चालू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हळवळ, वागदे आणि जानवली (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या गावांमधील नागरिकांना आर्थिक अमिष दाखवून केलेली फसवणूक

**(३३) * १५७१० श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हळवळ, वागदे आणि जानवली (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या गावांमधील सुमारे दोनशेहुन अधिक नागरिकांना माहे एप्रिल, २०२५ ते जुलै, २०२५ या चार महिन्यांच्या कालावधीत आर्थिक अमिष दाखवून त्यांचे नावे प्रत्येकी पन्नास हजार ते दीड लाख रुपये कर्ज गावातील ओळखीच्या व्यक्तीनीच उचल केल्याची बाब माहे जुलै, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर व्यक्ती कर्ज घेऊन फरार झाल्याने कर्जाचे हप्ते फेडण्याची वेळ ज्यांच्या नावे कर्ज काढले आहे त्यांच्यावर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी पॅगोडा, संचयनी सारख्या कोट्यवधीची फसवणूक झालेल्या घटना घडलेल्या असतांना देखील नव्याने कर्ज काढून आर्थिक फसवणूक होत असल्याच्या तक्रारी स्थानिक पोलीस ठाण्यात करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितांना अटक करुन त्यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशतः खरे आहे.

हळवळ, वागदे आणि जानवली (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या गावांमधील सुमारे दोनशेहुन अधिक नागरिकांना आर्थिक अमिष दाखवून त्यांचे नावे गावातील ओळखीच्या व्यक्तीनीच प्रत्येकी पन्नास हजार ते दीड लाख रुपये कर्ज उचल केल्याची घटना ऑगस्ट २०२२ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीतील आहे.

(२) हे खरे आहे.

(३) बँक किंवा फायनान्स कंपन्यांकडून नव्याने कर्ज काढून आर्थिक फसवणूक केल्याबाबत सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये कणकवली पोलीस स्टेशन वगळता इतर स्थानिक पोलीस स्टेशन येथे तक्रारी अगर गुन्हे दाखल नाहीत.

(४) हळवळ, वागदे आणि जानवली (ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग) या गावांमधील सुमारे दोनशेहुन अधिक नागरिकांना आर्थिक अमिष दाखवून त्यांचे नावे प्रत्येकी पन्नास हजार ते दीड लाख रुपये कर्ज गावातील ओळखीच्या व्यक्तीनीच उचल केल्याच्या घटनेच्या अनुषंगाने कणकवली पोलीस ठाणे, सिंधुदुर्ग येथे भारतीय न्याय संहिता कलम ३१८, ३(५) अन्वये गु.र.नं. ३१२/२०२५ नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणी २ आरोपी निष्पन्न झाले असून त्यांचा शोध घेण्यात येत आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वेब सिरीजच्या ऑडीशनसाठी बोलविलेल्या मुलांना ओलीस ठेवल्याबाबत

**(३४) * १९७४६ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील श्री. रोहीत आर्या नावाच्या व्यक्तीने पवईच्या आर.ए. स्टुडीओमध्ये वेब सिरीजच्या ऑडीशनसाठी राज्यातील विविध भागातून आलेल्या १५ वर्षांखालील १७ मुलांसह २० जणांना ओलीस ठेवून आपल्या मागण्या

मान्य करा असे धमकावत असतांना मुलांच्या सुटकेसाठी केलेल्या कारवाईत अपहरणकर्त्यांचे एन्कांउटर होवून पोलीसांनी मुलांची सुटका केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपहरणकर्ता आरोपी एका एन.जी.ओ. चा संस्थापक संचालक असून 'माझी शाळा सुंदर शाळा' या शासकीय योजनेचे स्वच्छता मॉनीटरचे काम केले असतांना देखील त्याने केलेल्या कामाचे दोन कोटीहून अधिक रक्कम त्याला मिळत नसल्याचा आरोप त्याने केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मागील एक वर्षापासून त्याला उक्त कामाचे देयक प्राप्त झाले नसल्याने त्याने आंदोलन व उपोषण केल्यानंतरही याबाबतची दखल शासनाने घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

रोहित आर्या याने आर.ए. स्टुडीओ, महावीर क्लासीक सोसायटी, एल अॅन्ड टी गेट नं. ०६ च्या समोर, साकी विहार रोड, पवई, मुंबई या ठिकाणी ०७ ते १४ वयोगटातील १७ मुलांना तसेच ०३ व्यक्तींना पिस्टल, पेट्रोल, सोलूशन, लायटर बाळगून त्यांना जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने ओलीस ठेवले होते. त्यावेळी ओलीस ठेवलेल्यांची सुखरूप सुटका करण्यासाठी पवई पोलीस ठाणेकडून पोलीस पथक घटनास्थळावर गेले होते. त्यावेळी पोलीसांनी ओलीस ठेवलेल्यांच्या सुरक्षेसाठी व स्वसंरक्षणाकरीता गोळीबार केला असता रोहित अशोक आर्या हा जखमी झाला होता. त्यानंतर सदर जखमी इसम नामे रोहित आर्या यास उपचाराकरीता ट्रॉमा हॉस्पिटल, जोगेश्वरी येथे दाखल केले असता उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यास मयत घोषित केले. त्यावरुन पवई पोलीस ठाणे, बृहन्मुंबई शहर (गु. प्र. शा.) येथे गु. र. क्र. ९९/२०२५, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १९४ अन्वये नोंद घेण्यात आली आहे.

तसेच सदर प्रकरणी पवई पोलीस ठाणे, बृहन्मुंबई शहर येथे दि.३१.१०.२०२५ रोजी गु.र.क्र. ११२९/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०९ (१), १४०, २८७ सह शस्त्र अधिनियम, १९५९ मधील कलम ३,२५ अन्वये रोहीत आर्या याचेविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा व अपमृत्युचा तपास गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडून करण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

परंतु, रोहीत आर्या यांनी माझी शाळा सुदंर शाळा या शासकीय योजनेचे स्वच्छता मॉनिटर या प्रकल्पासाठी शासनाला प्रस्ताव सादर केला होता. तथापि, रोहीत आर्या यांचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला नव्हता त्यामुळे त्यांना कोणताही मोबदला देण्यात आला नव्हता.

रोहीत आर्या यांनी शैक्षणिक संस्थाकडून वसुल केलेले शुल्क शासकीय खात्यामध्ये जमा करण्याबाबत शिक्षण विभागामार्फत कळवून देखिल रोहीत आर्या याने हे शुल्क शासकीय खात्यामध्ये जमा केले नाही असे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचे जा.क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र. १५६/एसडी-४, दिनांक १९ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या अहवालावरुन दिसून येते.

(३) रोहीत आर्या यांनी माझी शाळा सुदंर शाळा या शासकीय योजनेचे स्वच्छता मॉनिटर या प्रकल्पासाठी शासनाला प्रस्ताव सादर केला होता. तथापि, रोहीत आर्या यांचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला नव्हता त्यामुळे त्यांना कोणताही मोबदला देण्यात आला नव्हता. तथापि, रोहीत आर्या यांनी आझाद मैदान येथे दिनांक १०/१०/२०२४ ते १६/१०/२०२४ आणि ०२/०५/२०२५ ते ०७/०५/२०२५ कालावधीत आंदोलन केले आहे.

(४) सदर गुन्हयामध्ये एकूण ७३ साक्षीदार तपासण्यात आले असून यातील उर्वरीत बळीत अल्पवयीन मुलामुलींचे तसेच पालकांचे जबाब नोंद करण्यात येत आहेत.

रोहित आर्या याच्या मृत्यू बाबत पवई पोलीस ठाणे येथे अपमृत्यू क्र. ९९/२५ या अपमृत्यू प्रकरणाची पुढील चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील अधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार

**(३५)** * **१९९५३ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील श्री.दयानंद गावडे, (DYSP) तसेच श्रीमती माधुरी भोसले यांनी त्यांची पदोन्नती / बदली होऊनही लाचलुचपत प्रतिबंधक विभागात स्वतःची पद:स्थापना कायम ठेवण्याकरीता करोडो रुपयांची देवाणघेवाण करून लाचलुचपत प्रतिबंधक विभागात करून घेतली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त दोन्ही अधिकारी हे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने कार्यालयात गैरव्यवहार करीत असून त्यांनी प्रचंड प्रमाणात कमाविलेल्या पैशांमध्ये बेहिशोबी मालमत्ता, फ्लॅट, भूखंड, रोख रक्कम तसेच कंत्राटदार व लोकांकडे व्याजाने पैसे ठेवले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्याविरुद्ध शासनाकडे तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असूनही त्यांच्याविरुद्ध कोणतीची कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

I. श्री. दयानंद गावडे, पोलीस उप अधीक्षक (एटप) हे बदलीने दिनांक १९.०६.२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागात हजर झाले असून ते दिनांक २५.०८.२०२४ पर्यत ला.प्र.वि. पालघर येथे कार्यरत होते.

II. तदनंतर श्री. दयानंद गावडे हे अंतर्गत बदलीने दिनांक २६.०८.२०२४ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र येथे कार्यरत असून सदर विभागातील त्यांचा विहित कालावधी अद्याप पुर्ण झालेला नाही.

III. श्रीमती माधुरी भोसले या दिनांक १५.०३.२०२३ पासून अंतर्गत बदलीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र येथे कार्यरत असून त्यांचा विहित कालावधी पुर्ण झाला असून पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयाने दिनांक २७.०५.२०२५ च्या आदेशान्वये त्यांची महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधनी, पुणे येथे बदलीने पदस्थापना केली आहे. परंतु श्रीमती भोसले यांच्याकडे महत्त्वाची चौकशी प्रकरण सुरु असून त्यांच्या जागेवर अद्यापपर्यंत इतर अधिकारी हजर न झाल्याने त्यांना अद्याप कार्यमुक्त करण्यात आले नाही.

(२), (३) व (४) I. श्री. दयानंद गावडे व श्रीमती माधुरी भोसले यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार व अपसंपदेचे आक्षेप असलेले तक्रार अर्ज लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राप्त झाले आहेत, ही बाब खरी आहे.

II. सदर दोन्ही अधिकारी यांच्या विरुद्ध प्राप्त झालेल्या तक्रारींपैकी १ तक्रार ही अर्जदाराशी संपर्क होत नसल्याने आणि दुसरी तक्रार ही कोणीतरी दुस-याचे नाव वापरुन खोडसाळपणे (Pseudonymous) केली असल्याचे चौकशीदरम्यान निष्पन्न झाल्याने सदर तक्रार अर्ज दप्तर दाखल करण्याबाबत पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांना अहवाल सादर केला आहे.

III. तसेच संबंधित अधिकारी यांच्याविरुद्ध अन्य अर्जदाराच्या तक्रार अर्जासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई, नागपूर व अन्य प्रमुख शहरांतील हवेची गुणवत्ता**
**धोकादायक पातळीवर पोहचल्याबाबत**

**(३६) * १५७५२ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, नागपूर व अन्य प्रमुख शहरांतील हवेची गुणवत्ता धोकादायक पातळीवर पोहोचल्याचे निदर्शनास आले असून नागपूर शहरातील वायु गुणवत्तेबाबत सर्वेक्षणात वर्षभरातील ३६५ दिवसांपैकी नागपूर शहरात ३०० दिवस वायु प्रदूषण असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईच्या हवेतील पीएम २.५ (फाईन पाटिक्युलेट मॅटर) व पीएम १० (कोरस पॉर्टिकल्स) या प्रदुषकांच्या दैनंदिन सरासरी पातळीत माहे जानेवारी, २०२५ पासूनच सर्वाधिक नोंद झाली असून प्रदूषणामुळे नागरिकांच्या फुफ्फुस, हृदय आणि मेंदूच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून फटाक्यांच्या धुरामुळे प्रदूषणात अधिकच वाढ होत असल्याने फटाक्यांच्या विक्री व वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी नागरिकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम लक्षात घेता शासनाने कोणती विशेष जनजागृती मोहीम व कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(३) असल्यास, मुंबईतील १६ हून अधिक प्रदूषण मॉनिटरिंग स्टेशन्सपैकी खराब झालेल्या स्टेशन्सची दुरुस्ती व अपग्रेडेशन करणे आवश्यक असून जेणेकरून प्रदूषण पातळीचे अचूक मूल्यांकन होईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भारतीय उष्णकटिबंधीय मौसम विज्ञान संस्थान (IITM) व महानगरपालिकांनी यासंदर्भात कोणत्या अधिकृत सादर केलेल्या अहवालांनुसार प्रदूषणाच्या उच्च पातळीला कारणीभूत असलेल्या मुख्य स्त्रोतांची (उदा. बांधकामे, वाहने, उद्योग) ओळख पटवून, त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

सतत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी केंद्रातील मासिक अहवालानुसार हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) प्रामुख्याने समाधानकारक (AQI ५१–१००) व मध्यम (AQI १०१-२००) श्रेणीत नोंदविला गेला आहे. केवळ काही निवडक ठिकाणी हिवाळयामध्ये काही दिवसांमध्येच हवा गुणवत्ता निर्देशांक खराब (AQI २०१-३००) श्रेणीत असल्याचे आढळून आलेले आहे.

(२)
- माहे जानेवारी, २०२५ ते ऑक्टोवर, २०२५ या कालावधीत काही हवा गुणवत्ता तपासणी केंद्रे वगळता इतर सर्व केंद्रावर हवा गुणवत्ता निर्देशांक समाधानकारक व मध्यम स्वरुपाचा आढळून आलेला आहे.
- सार्वजनिक आरोग्य विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या प्राप्त अहवालानुसार मुंबई शहर व उपनगरातील रुग्णालयात नोंद झालेल्या श्वसन विकारांच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्याचे आढळून येत नाही.
- मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयामध्ये असलेल्या एकूण २४ प्रशासकीय विभागामध्ये असलेल्या फटाका विक्रीच्या वैध परवान्यांवर पोलीस व मुंबई अग्निशमन दल यांचेमार्फत अतिशय कडक निर्बंध व अटी/शर्ती लादण्यात आल्यामुळे वैध परवान्यांची संख्या कमी झाली आहे. तसेच या बाबतचे निकष कडक झाल्याने अनधिकृत फटाका विक्री वाढू नये याकरिता दिवाळी सणाच्या दरम्यान निर्मुलनाची कारवाई केली जाते व जप्त केलेल्या सर्व फटाक्यांचा माल गोदामात ठेवलेल्या पाण्याच्या टाक्यांमध्ये नष्ट केला जातो.
- अनुज्ञापन खात्यामार्फत दि.१५/१०/२०२५ ते दि. २५/१०/२०२५ या कालावधीमध्ये पदपथावर/ रस्त्यांवर विनापरवाना फटाके विक्री करणाऱ्यांविरुध्द केलेल्या कारवाईमध्ये एकूण १४६५.२२५ किलोग्राम फटाके जप्त करुन नष्ट करण्यात आले.

(३) हे खरे नाही.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात वायु सर्वेक्षणासाठी कार्यरत असलेल्या एकूण २८ स्वयंचलित वायु सर्वेक्षण केंद्रांचे (CAAQMS) परीरक्षण व कॅलिब्रेशनचे काम सुरळीतरीत्या सुरु आहेत. त्यामुळे प्रदूषक घटकाचे मोजमाप अचूकरीत्या करण्यात येते.

(४) वायु प्रदूषण नियंत्रणाकरिता बांधकाम कंत्राटदार, बांधकाम व्यावसायिक, विकासक, महापालिका अधिकारी व विभाग स्तरावरील अधिकारी यांनी करावयाच्या उपाययोजनासंबंधी 'सर्वकष मार्गदर्शकतत्वे' दिनांक २५/१०/२०२३ रोजी सर्व संबंधितांना निर्गमित करण्यात आलेली आहेत.

तसेच, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितींच्या शिफारशींनुसार हवा प्रदूषणाला आळा घालण्याकरीता विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना (जि.जालना) येथील जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनीतील अल्पवयीन मुलींचे व्यवस्थापकाने लैंगिक शोषण केल्याबाबत

**(३७)** * **१७६३५ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना (जि.जालना) येथील जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनीतील अल्पवयीन मुलींचे व्यवस्थापकाने लैंगिक शोषण केल्याची बाब दिनांक २९ जुलै, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कदीम पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे, खरे आहे.

सदर प्रकरणी कदीम पोलीस ठाणे गु.र.नं. ३१९/२०२५ भा.न्या.सं.,२०२३ चे कलम ७४,७५ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम,२०१२ चे कलम ८,१०,१२ सह बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ चे कलम ७५ प्रमाणे दिनांक २७/०७/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी दि.१७.०९.२०२५ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: पालघर, नागपूर व ठाणे जिल्ह्यात महावितरण कंपनीच्या कंत्राटदारांकडून नवीन स्मार्ट मीटर बसविल्याबाबत

**(३८) * १६६३८ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.राजेश मोरे (कल्याण ग्रामीण), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: वाडा (जि.पालघर), उमरेड व सावनेर (जि.नागपूर) आणि ठाणे जिल्ह्यात ग्राहकांना विश्वासात न घेता महावितरण कंपनीच्या कंत्राटदाराकडून नवीन स्मार्ट मीटर बसविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोढा-पलावा (डोंबिवली) येथील ग्राहकांना दोन ते अडीच हजारांवरुन येणारे देयक स्मार्ट मिटरमुळे वीस ते अठ्ठावीस हजार इतकी आल्याने त्यांना मोठ्या प्रमाणात भुर्दंड सोसावा लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तसेच पलावा येथील कासा युनो मधील सदनिका गत पाच वर्षांपासून बंद असताना देखील सेवाशुल्क आणि किमान वापर म्हणून तीनशे ते चारशे रुपये मासिक देयक आले असून, स्मार्ट मीटर बसविल्यानंतर त्यांना जून महिन्याचे देयक सुमारे अकरा हजार इतके आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिकांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे उपविभागीय अधिकारी यांना वीज दरवाढ कमी करण्यासाठी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने बसविण्यात आलेले मीटर काढून पुर्वीचेच मीटर लावून देण्याबाबत तसेच चुकीच्या वीज देयकाची वाढीव रक्कम परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

स्मार्ट मीटरचे विविध फायदे विचारात घेऊन केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने दि. २६.०२.२०२१ रोजी सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर लावण्याचे सुचित केले आहे. केंद्र शासनाच्या दि.१७.०८.२०२१ रोजीच्या राजपत्रानुसार सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर बसविण्याबाबत कळविले आहे.

(२) हे खरे नाही,

एप्रिल-२०२५ ते जुलै-२०२५ या कालावधीत पलावा सिटी डोंबिवली येथे २४,३२० ग्राहकांस स्मार्ट मिटर बसविण्यात आले आहे. त्यापैकी ऑगस्ट-२०२५ मध्ये एकूण १३७६ (६%) बिलींगच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून, सर्व तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही,

पलावा कासा युनो मध्ये जून-२०२५ महिन्यात सर्व ६७५ वीज ग्राहकांना स्मार्ट मिटर बसविण्यात आले आहे. सदर ग्राहकांना माहे जून-२०२५ चे वीज देयक मीटर रिडींग प्रमाणे देण्यात आलेले आहे.

(४) अशा प्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तनवाडी, मुर्ती व लिंबी (ता.घनसावंगी, जि. जालना) गावातील ऊसाच्या पिकास विजेच्या तारांमुळे आग लागल्याबाबत

**(३९) * १८८९९ श्री.हिकमत उढाण (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसांवगी (जि.जालना) तालुक्यातील मौजे तनवाडी येथील २० एकर, मूर्ती येथील १० एकर व लिंबी येथील ५ एकर क्षेत्रातील विजेच्या तरंगत्या तारांमुळे आग लागून ऊसाच्या काढणीस आलेल्या पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विजेच्या तारांबाबत, विजेचे खांब कमी खोलीवर रोवल्याचे व विजेच्या तारा शेतात तरंगत असल्याची तक्रार गेली ३ वर्षे वारंवार शेतकरी करीत असून देखील हेतुपुरस्सर विद्युत निरिक्षकामार्फत व वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत टाळाटाळ करुन याची पाहणी करण्यात आली नसल्याने शेतपिकाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे,

घनसांवगी (जि. जालना) तालुक्यात ऑक्टोबर, २०२५ मध्ये मौजे तनवाडी, मूर्ती, लिंबी या ठिकाणी शेतातील वाढ झालेल्या ऊसाच्या शेंडाचा संपर्क वाऱ्यामुळे उच्चदाब वाहिनीचा संवाहकामध्ये झाल्याने शॉट सर्कीट होऊन आगीच्या ठिणग्या ऊसावर पडून आग लागून जळीत अपघात घडला आहे.

(२) हे खरे नाही.

विजेच्या तारांबाबत, देखभाल व दुरुस्ती महावितरण कंपनीकडून केली जाते, घनसावंगी उपविभाग अंतर्गत विजेचे खांब कमी खोलीवर रोवल्याचे व विजेच्या तारा शेतात तरंगत असल्याची तक्रार विद्युत निरीक्षक कार्यालय, विद्युत निरीक्षण विभाग जालना या कार्यालयास शेतकरी किंवा इतर कुणाकडूनही अशी तक्रार अद्याप पर्यंत प्राप्त झालेली नाही.

(३) सदर अपघाताची विद्युत निरीक्षक, जालना कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली असून, सदर अपघातास महावितरण कंपनी जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

विद्युत निरीक्षक, जालना कार्यालयाने दि.०६.११.२०२५ रोजीच्या पत्रानुसार, विजेच्या तारांमध्ये झोळ निर्माण होऊन जळीत अपघात होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याने याबाबत अधीक्षक अभियंता, महावितरण, जालना यांना उपाययोजना करणेबाबत कळविण्यात आले आहे. तसेच विजेच्या दोन खांबांमधील अंतर कमी करून, वीज खांब योग्य खोलीवर रोवण्याबाबत कार्यकारी अभियंता, जालना विभाग क्र. ०२, जालना यांना देखील दि.१९.११.२०२५ नुसार कळविले आहे. सदर अपघात प्रकरणातील मौजे मूर्ती, तनवाडी राहेरा, लिंबी (ता.घनसावंगी, जि.जालना) येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबतची प्रक्रिया महावितरण कंपनीमार्फत सुरु करण्यात आली असून, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर नुकसान भरपाई अदा करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील अनधिकृत बांधकामाप्रकरणी ठाणे महानगरपालिका उपायुक्त यांनी केलेला गैरव्यवहार

**(४०) * १७७७८ श्री.महेश सावंत (माहिम), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील एका बांधकाम व्यावसायिकाच्या अनधिकृत बांधकामाप्रकरणी सुमारे ५० लाख रुपयांपैकी ३५ लाख रुपये स्विकारल्याप्रकरणी ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त, श्री.शंकर पाटोळे यांना ठाणे पोलिसांनी माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रस्तुत प्रकरणी आलोसे उपायुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्या वतीने खाजगी इसमाने लाचेची रक्कम स्विकारली असल्याने आलोसे यांना अटक करण्यात आली आहे.

(२) I. तक्रारदार (विकासक) यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिलेल्या तक्रारीवरुन, लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान विकसित करावयाच्या जागेवर असलेली ०३ अनधिकृत दुकाने निष्काषित करण्याकरिता आलोसे क्र.१, उपायुक्त (परिमंडळ-२), ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडे रु.५०,००,०००/- इतक्या रक्कमेच्या लाचेची मागणी करुन पहिला हप्ता रु.२५,००,०००/- इतकी रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व सदरची रक्कम आलोसे यांच्यावतीने आरोपी क्र.२, खाजगी इसम यांना स्विकारतांना पकडण्यात आले.

II. तसेच यापुर्वीही आलोसे, उपायुक्त (परिमंडळ-२), ठाणे महानगरपालिका यांच्या सांगण्यावरून आरोपी क्र.३, खाजगी इसम यांच्या बँक खात्यात रु.१०,००,०००/-रुपये ट्रान्सफर केले म्हणून तिन्ही आरोपीतांविरुद्ध नौपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गु.र.नं. ६७१/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७, ७(अ) व १२ प्रमाणे दिनांक ०२/१०/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

III. सदर गुन्ह्यामध्ये समाविष्ट असणारे १ लोकसेवक व इतर ४ खाजगी इसम यांना अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा सखोल तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरू आहे.

IV. या प्रकरणी, दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने, आलोसे क्र.१, यांना दिनांक ०४.१०.२०२५ रोजीच्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले असून त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ अन्वये शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित आहे.

(३) आलोसे यांच्याविरुद्ध दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने घेतलेल्या घरझडतीत ६७० ग्रॅम सोनेसह एकुण रु.२५,७६,८३४/- किंमतीच्या चिजवस्तु व रोख रक्कम रु.३,६२,८००/- आढळुन आली आहे. सदर रक्कम जप्त करण्यात आली असून आलोसे यांच्या मालमत्तेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्ह्यातील मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर**
**लहान मुलाचा झालेला मृत्यू**

**(४१) * १६८०० श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वर्सोवा पुल ते नायगाव फाटा या दरम्यान वाहतूकोंडीत पाच तास रुग्णवाहिका अडकल्याने पेल्हार, वसई येथील दीड वर्षीय कु.रियान शेख या लहान मुलाचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २० सप्टेंबर, २०२५ रोजी घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच उक्त मार्गावर संबधित विभागाच्या नियोजनाअभावी दररोज वाहतुकीची कोंडी होत असल्याने वाहतुकदार आपली वाहने महामार्गालगत असलेल्या गावातून घेऊन जात असल्याने तेथील रस्त्यावर देखील वाहतुकीची कोंडी निर्माण झाली असून नायगाव, वसई गाव, नालासोपारा व विरार या शहरातील प्रमुख रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्यांवरील खड्डे, दररोज होणारे अपघात त्यातून निर्माण होणारे वादविवाद, हाणामाऱ्या आणि वाहने नादुरुस्त होण्याचे प्रकार यामुळे जुचंद्र, चंद्रपाडा, वाकीनगर, नायगाव, कामण, चिंचोटी, ससुनवघर, मालजीपाडा व बापाने या गावांतील ग्रामस्थ मोठया प्रमाणावर त्रस्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मृत पावलेल्या मुलाच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करण्यासह वाहतुकीचे योग्य नियोजन, रस्ते दुरूस्ती व दररोजच्या वाहतुक कोंडीतून वाहतुकदार व ग्रामस्थांची सुटका करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदरची घटना ही दि. १८.०९.२०२५ रोजी घडलेली आहे. घोडबंदर ते ठाणे रोडवर काजूपाडा ते निरा केंद्र दरम्यान रोडचे काम चालू असल्याने वाहतूक धिम्या गतीने सुरु होती. त्यावेळी ॲम्ब्युलन्स व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने गुजरात मार्गिकेवरील एका मार्गिकेवरुन मुंबईच्या दिशेने सोडण्यात येत होती.

सदर दिवशी दीड वर्षाच्या मुलाचा राहत्या घराच्या दुसऱ्या मजल्यावरुन पडल्याने त्यास उपचाराकरिता मुंबईकडे नेत असताना त्यास ससुनवघर येथील डॉक्टरांनी तपासून त्यास मयत घोषीत केले होते.

याबाबत पेल्हार पोलीस स्टेशन येथे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १९४ अन्वये दि.२२.०९.२०२५ रोजी अकस्मात मृत्यु रजिष्टर नंबर १४३/२०२५ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे.

घोडबंदर-ठाणे या राज्यमहामार्गावर रस्ता दुरुस्तीकरिता वाहतूक नियंत्रणासाठी महानगरपालिकेमार्फत पोलीस विभागास पत्रव्यवहार करण्यात आलेला होता. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने वाहतूक नियंत्रण अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली होती. वाहतूक नियमनाकरिता पुरेसा बंदोबस्त देखील नेमण्यात आलेला आहे.

(३) वेगवेगळया ठिकाणावर एकूण ३ अधिकारी, २४ अंमलदार व पेट्रोलिंगमध्ये वाहनासह एकूण ५ अंमलदार नेमण्यात आलेले आहेत.

तसेच काही प्रसंगी अचानक होणाऱ्या अपघातामुळे वाहतूक कोंडी होत असते. त्यावेळी अतिरिक्त मनुष्यबळ नेमून ती तात्काळ हटविण्यात येते.

(४) वाहतूक नियंत्रण शाखा वसई विभागात दिवस/रात्री पोलीस अधिकारी व अंमलदार यांची नेमणूक करुन कोठेही रोडवर किंवा रोडच्या कडेला कोणतेही वाहन उभे राहणार नाही. तसेच कोणत्याही वाहिनीवर विरुध्द दिशेने (रॉंग साईड) वाहने जाऊन वाहतूक कोंडी होणार नाही, याची काळजी घेतली जाते. सदर रोडवर अपघात झाला तर जखमींना तात्काळ हॉस्पीटल येथे पोहोच करुन अपघातामधील वाहने-ही तात्काळ हटवून वाहतूक कोंडी होणार नाही, याची काळजी घेतली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील निरज मल्टीपर्पज निधी, निरज अर्बन को-ऑपरेटीव्ह निधी तसेच निरज अर्बन क्रेडीट को-ऑपरेटीव्ह सोसायटीमधील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(४२) * १५८४८ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील निरज मल्टीपर्पज निधी, निरज अर्बन को-ऑपरेटीव्ह निधी तसेच निरज अर्बन क्रेडीट को-ऑपरेटीव्ह सोसायटी येथील कर्मचाऱ्यांनी सदर संस्थांमध्ये सन २०२१ ते २०२५ दरम्यान झालेल्या कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार करणारा मुख्य आरोपी श्री.युवराज गिहे व संचालक मंडळावर कारवाई होण्यास विलंब होत असल्याची लेखी तक्रार फ्रेजरपुरा पोलिस स्टेशनमध्ये दिनांक २ जून, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने बल्लारपूरचे लोकप्रतिनिधी यांनी मा.राज्यपाल महोदयांना दिनांक ३० ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यस, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी दि.०२ जून, २०२५ रोजी मुख्य आरोपी व संचालक मंडळावर कारवाई होण्यास विलंब होत असल्याबाबत लेखी तक्रार पोलीस स्टेशन फ्रेजरपूरा येथे प्राप्त झालेली नाही तथापि, अमरावती जिल्ह्यातील निरज मल्टीपर्पज निधी लि. या संस्थेविरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि.२० मे, २०२५

रोजी पोलीस स्टेशन चांदुररेल्वे येथे गु. र. क्र. २७३/२०२५ कलम ३१६ (२), ३१८ (४), ३१६(५), ३१८(२), ३१६(५) भा. न्या. स. सहकलम (३) एमपीआयडी ॲक्ट, १९९९ प्रमाणे एकूण सात आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच निरज अर्बन को-ऑपरेटीव्ह निधी लि. या संस्थेविरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि.२ ऑगस्ट, २०२५ रोजी पोलीस स्टेशन अचलपूर येथे गु. र. क्र. २१७/२०२५ कलम ३१८(२), ३१६(५), ३१८(४), ३(५) भा. न्या. स. सहकलम (३) एमपीआयडी ॲक्ट, १९९९ प्रमाणे एकूण सात आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी संस्थेच्या २ संचालकांना अटक करण्यात आली असून ते सद्या न्यायालयीन कोठडीत आहे. इतर १ आरोपीस अटकपूर्व जामीनावर सुटला असून अन्य ४ आरोपींचा शोध सुरु आहे. उपरोक्त दोन्ही गून्हयाच्या अनुषंगाने मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यात प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून नागरिकांवर अन्यायकारक पद्धतीने दंड आकारण्यात आल्याबाबत

**(४३) * १९३९० श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध ठिकाणी तसेच ठाणे जिल्हयात प्रादेशिक परिवहन कार्यालयांकडून (RTO) नागरिकांच्या वाहनांवर चुकीच्या व बेकायदेशीर पद्धतीने दंड आकारण्यात येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांना कोणत्याही ठोस कारणाशिवाय दंड लावणे, मोबाईलवरून फोटो स्कॅन करून चुकीच्या नोंदींवर कारवाई करणे, तसेच दुचाकी वाहनाचे उल्लंघन दाखवून चारचाकी वाहनधारकांवर दंड आकारणे असे गंभीर प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री, परिवहन मंत्री, पोलीस महासंचालक, तसेच प्रधान सचिव, परिवहन व गृह विभाग यांना दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान ई-मेलद्वारे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार चुकीच्या व बेकायदेशीर पद्धतीने आकारण्यात आलेले दंड रद्द करून भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील तरतूदीनुसार पोर्टलवर ई-चलान जारी करण्यात येत आहे. सदर नियमातील १६७-अ अन्वये इलेक्ट्रॉनिक्स देखरेख व रस्ता सुरक्षा अंमलबजावणी माध्यमाद्वारे चलान जारी करणे आणि त्याबाबत तडजोड शुल्काचा भरणा करण्याबाबत तरतुद आहे.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ व त्याअंतर्गत नियमांतील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालक / मालकांविरुद्ध परिवहन विभागामार्फत विविध गुन्हे नोंदवून प्रतिवेदने जारी करण्यात येतात व त्याबाबत वाहनांच्या नोंदी संगणक प्रणालीमध्ये घेतल्या जातात.

वाहन धारकास तपासणी प्रतिवेदन जारी केलेल्या दिनांकापासून न्यायालयामध्ये खटला दाखल केलेली प्रकरणे वगळता ९० दिवसानंतरही प्रतिवेदन प्रलंबित राहिल्यास वाहनधारकास तडजोड शुल्क भरण्यासाठी एक अतिरिक्त नोटीस इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे पाठविण्यात येते. त्यानंतरही वाहन धारकाने तडजोड शुल्क भरणा केला नाही तर सदरील प्रकरणे मा. न्यायालयात दाखल केली जातात. याबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करण्याबाबत क्षेत्रीय अधिकारी यांना सूचित करण्यात आले आहे.

मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करीत असताना फोटो / चित्रीकरण करण्याकरिता स्वत:चा वैयक्तिक मोबाईलचा वापर न करता ई-चलान मशिनचा वापर करणेबाबत अतिरिक्त पोलीस महासंचालक (वाहतूक), मुंबई यांनी दिनांक ०३.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सूचना जारी केलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्ह्यातील राजीवडा ते कर्ला रस्त्यावर ब्राऊन हेरॉईन हा अंमली पदार्थ स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने जप्त केल्याबाबत**

**(४४) * १५७१२ श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील राजीवडा ते कर्ला रस्त्यावर ब्राऊन हेरॉईन हा अंमली पदार्थ विक्रीसाठी आणलेल्या दोघांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने दिनांक २५ जुलै, २०२५ रोजी वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अटक केलेल्या आरोपींकडून तब्बल ९०,५०० रुपयांचे ११ ग्रॅम ब्राऊन हेरॉईन जप्त करण्यात आले असून, दीड वर्षांपासून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची विक्री सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) दि.२४.०७.२०२५ रोजी राजीवडा ते कर्ला जाणाऱ्या रोडवर ता.जि. रत्नागिरी येथे दोन व्यक्तींच्या ताब्यात रु.८५,५००/- रुपये किंमतीचे ब्राऊन हेरॉईन सदृष्य अंमली पदार्थ व रु.५०००/- रोख रक्कम असा एकूण रु.९०,५००/- किंमतीचा मुद्देमाल गैरकायदा विक्रीकरिता बाळगल्याचे मिळून आल्याने, रत्नागिरी शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३३१/२०२५ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८(क),२१(ब),२९ अन्वये गुन्हा नोंद करुन अटक करण्यात आली.

सदर प्रकरणातील दोन आरोपींविरुद्ध मा.न्यायालयात दि.१३.०९.२०२५ रोजी दोषारोप पत्र सादर करण्यात आले असून त्यांना दि.१७.१०.२०२५ रोजी जामीन मिळाला आहे. सदर आरोपींवर बीएनएसएस १२९ अन्वये दि.०४.११.२०२५ रोजी प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील गावांना वीज पुरवठा करणेबाबत

**(४५)** * **१९१६५ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील अनेक गावे, वस्त्या/वाड्या स्वातंत्र्याच्या ७९ वर्षानंतरदेखील आजतागायत वीज मिळण्यापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टहारपूर ग्रामपंचायत हद्दीतील पंडीतवाडी व नवीनवाडी, भावसे (नाग्या कातकरी वाडी), कलमवाडी (हायवेवाडी कानविंदे), दळखण (कातकरी वाडी आणि विंचूपाडा), शिरोळ (अंधेरवाडी उंबरमाळी, नाग्या कातकरीवाडी), पाषाणे (काजलविहिर, नवीन वाडी), भागदल (नवीनवाडी), कलगाव (नवीनवाडी), खारिवली (नवीनवाडी), धामणी (नवीनवाडी जरंडी आणि तलेखन), चिखलगाव (चिखलगाववाडी) सोगाव (खरांगण), मानेखिंड, गुंडे डेहणे (पाचघर), अजनुप (सावरफूट) व पिवळी (हेदुचापाडा) ही गावे व पाडे अंधारात असून तेथील रहिवाशी विजेच्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज पुरवठा नसल्यामुळे वस्तीतील ग्रामस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून मुलांना अभ्यास करता न येणे, तसेच रात्रौ भितीचे वातावरण निर्माण होऊन शेती व इतर कामासाठी विजच नसल्याने ग्रामस्थांनी त्यांचे वस्तीत व गावात वीज मिळावी याकरिता अनेकदा शासनाकडे अर्ज-विनंत्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने सदर तालुक्यातील गावांना वीज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) धामणी (तलेखन), चिखलगाव (चिखलगाववाडी), सोगांव (खरांगण), मानेखिंड, गूंडे डेहणे (पाचघर), पिवळी (हेदुचापाडा) हया पाडयांचे विद्युतीकरण झालेले आहे.

तसेच, टहारपूर पंडीतवाडी व नवीनवाडी, भावसे (नाग्या कातकरीवाडी), दळखण (कातकरीवाडी आणि विचूपाडा), शिरोळ (अंधेरवाडी उंबरमाळी, नाग्या कातकरीवाडी), भागदल (नवीनवाडी), कलगाव (नवीनवाडी), खारिवली (नवीनवाडी), धामणी (नवीनवाडी जरंडी), अजनुप (सावरकूट) हया नविन झालेल्या वाढीव वस्ती व पाड्यांचे अंदाजपत्रक मंजुर करुन त्याबाबतचे मागणी पत्र प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी प्रकल्प शहापुर यांच्याकडे दि.०४.११.२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश मिळण्यासाठी सादर करण्यात आले आहे. तसेच कलमवाडी (हायवेवाडी कानविंदे), पाषाणे (काजळ विहीर, नविनवाडी) या नविन वस्तीचे सर्वेक्षण करुन आवश्यक तांत्रीक अंदाजपत्रक मंजुरी करण्याची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील कोथरुड व डेक्कन येथे गुन्हेगारांच्या टोळीने व्यक्ती व पोलीस कर्मचाऱ्यांवर गोळीबार व कोयत्याने हल्ला केल्याबाबत

**(४६) * १७७८३ श्री.महेश सावंत (माहिम), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोथरुड (जि.पुणे) येथे एका गुन्हेगारी टोळीने श्री.प्रकाश धुमाळ या व्यक्तीवर गोळीबार केल्याचे तसेच श्री.सागर साठे या व्यक्तीवर कोयत्याने हल्ला केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणातील गुन्हेगारी टोळीचा प्रमुख असलेली व्यक्ती श्री.निलेश घायवळ हे खोट्या पासपोर्टच्या आधारे परदेशात फरार झाले असून, श्री.निलेश घायवळ व सचिन घायवळ यांचेवर पुणे पोलीसात गोळीबार, बोगस कागदपत्रे देऊन शस्त्र परवाना मिळवणे, गुन्हेगारी टोळीशी संबंध असणे, पासपोर्ट मिळविण्यासाठी खोटी माहिती देणे, खोटया पासपोर्टवर परदेशात ये-जा करणे इत्यादी प्रकारचे गुन्हे दाखल आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्ह्यात कोयत्याने हल्ला करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, पुण्यातील डेक्कन परिसरात गुन्हे शाखा युनिट-३ मध्ये कार्यरत असलेले पोलिस हवालदार श्री.अमोल काटकर यांच्यावरही काही अज्ञात व्यक्तींकडून कोयत्याने हल्ला केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह अशा प्रकारच्या घटना रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

निलेश घायवळ व सचिन घायवळ यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३, माहिती तंत्रज्ञान कायदा २०००, टेलीकम्युनिकेशन ॲक्ट, २०२३, पासपोर्ट ॲक्ट, १९६७, शस्त्र अधिनियम १९५९, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१, महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९, फौजदारी सुधारणा गुन्हेगारी कायदा अंतर्गत विविध कलमांन्वये पुणे पोलीस आयुक्तालयांतर्गत कोथरूड पोलीस स्टेशन येथे ९ आणि वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथे १ गुन्हा दाखल आहे.

तथापि, निलेश घायवळ व सचिन घायवळ यांनी बनावट कागदपत्रे सादर करून शस्त्र परवाना मिळविल्याबाबत गुन्हा नोंद नाही.

(३) हे अंशतः खरे आहे.

पुणे शहर गुन्हे शाखा युनिट ३ येथे कार्यरत असलेले पोहवा/अमोल काटकर यांच्या दुचाकीचा अन्य दुचाकीला धक्का लागल्याने झालेल्या वादातून अज्ञात व्यक्तीकडून लाठीने, हाताने व लाथा बुक्क्यांनी त्यांना पाठीवर, कपाळावर, कानावर मारहाण करुन जखमी केले आहे. सदरबाबत डेक्कन पोलीस स्टेशन १६५/२०२५ येथे भा. न्या. सं. कलम ११८ (१), ११८(२), ११५(२), ३५२, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यक्षेत्रामध्ये जानेवारी, २०२५ ते ऑक्टोबर, २०२५ अखेर पुणे शहरात कोयत्याने दहशत निर्माण केल्याबाबत २०० गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये ४०३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच या गुन्ह्यांमध्ये उपरोक्त नमूद ४०३ आरोपींसह १०३ विधी संघर्षीत बालकांचा सहभाग निष्पन्न झाला आहे.

(४) कोथरुड (जि.पुणे) येथे एका गुन्हेगारी टोळीने एका व्यक्तीवर केलेल्या गोळीबाराच्या घटनेच्या अनुषंगाने कोथरुड पोलीस स्टेशन येथे गु र नं. २५०/२०२५ येथे नोंद करण्यात आला आहे.

तसेच, कोथरुड (जि.पुणे) येथे एका गुन्हेगारी टोळीने एका व्यक्तीवर कोयत्याने हल्ला केल्याबाबतच्या घटनेच्या अनुषंगाने कोथरूड पोलीस स्टेशन येथे गु. र. न. २५१/२०२५ नोंद करण्यात आला आहे.

जानेवारी, २०२५ ते नोव्हेंबर, २०२५ या कालावधीमध्ये महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या विविध कलमांतर्गत पर्यंत एकूण १७३ गुन्हे, महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ अंतर्गत ३८० गुन्हे नोंद करण्यात आले असून महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले व औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ अंतर्गत १०४ प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत.

कायदा सुव्यस्थेच्या अनुषंगाने उद्भविणाऱ्या घटना रोखण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे :-

१) रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार/ गुन्हेगारी टोळीप्रमुख व टोळी सदस्य यांच्याकडून गुन्हा घडल्यास तात्काळ त्यांच्यावर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा-१९९९ (मोक्का), महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले, औषधीद्रव्ये वगैरे घोकादायक व्यक्ती करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणेबाबत, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (एमपीडीए) अन्वये तडीपारीची कारवाई केली जात आहे.

२) रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार व गुन्हेगारी टोळी सदस्य यांच्यावर पोलीस ठाणे स्तरावर व गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक व त्यांचे अंमलदार यांच्यावतीने नियमित निगराणी ठेवून त्यांच्या राहत्या घरी जाऊन तपासणी करण्यात येत आहे.

३) प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मोक्का मधील जामीनावर सुटलेले आरोपी, एमपीडीए केस मधील स्थानबद्धता संपुष्टात आलेले आरोपी तसेच पोलीस स्टेशन कडील खुन, खुनाचा प्रयत्न, शरीराविरुद्धचे गुन्हे, दरोडा, दरोड्याची तयारी, खंडणी, अपहरण, घरफोडी, एनडीपीएस, आर्म ॲक्ट, जुगार, इ. गुन्हे प्रकारामधील रेकॉडवरील गुन्हेगारांना पोलीस स्टेशन मध्ये एकत्र जमा करून त्यांच्याकडून डोजीयर फॉर्म भरून घेण्यात येतात.

४) प्रत्येक पोलीस ठाणे हद्दीमध्ये ऑल आऊट / कोंबिग ऑपरेशन राबवून संशयित वाहनांची, संशयित इसमांची तपासणी करण्यात येते. तसेच, गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्या आरोपींची कसून चौकशी करणेबाबत व ऑल आऊट/कोंबिंग ऑपरेशन दरम्यान क्रिमीनल हॉटस्पॉट असलेल्या ठिकाणांवर विशेष लक्ष देण्यात येत आहे.

५) विधीसंघर्षग्रस्त बालकांचे व त्यांच्या पालकांचे समुपदेशन करून त्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येते.

६) व्हॉटस अप, फेसबुक, इन्स्टाग्राम या सारख्या इतर सोशल मिडिया माध्यमातून कोयता हातात घेऊन दहशत माजविणाऱ्यांची माहिती काढून त्यांच्यावर त्वरित गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर, ठाणे व मुंबई येथे मोठ्या प्रमाणात मेफेड्रोन या अंमली पदार्थाची तस्करी व विक्री होत असल्याबाबत

**(४७) * १५८१३ श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथे मेफेड्रोन या अंमली पदार्थाची तस्करी करुन विक्री करणाऱ्या ५५ वर्षीय व्यक्तीला मुंब्रा येथे ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेने माहे जुलै, २०२५ मध्ये अटक करुन रुपये १ कोटी ६९ लाख २६ हजार किंमतीचा साठा जप्त केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वसई (पूर्व) येथील विक्टर ओडिचिम्मा ओनुवाला या नायजेरियन व्यक्तीकडून २२ किलो मेफेड्रोन (मूल्य ११ कोटी) आणि कोकेन, नालासोपारा येथील चिमा मॉसेस इबे या व्यक्तीकडून २०८ कोटींच्या मेफेड्रोन, एका नायजेरिन नागरिकांकडून रुपये ४२ लाख ८० हजार इतका मेफेड्रोन तसेच वसईतील एका फ्लॅटमधून २२.८६ किलो मेफेड्रोन जप्त करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कळवा (जि.ठाणे) मधील खारेगांव टोल नाक्याजवळ गुन्हे शाखेच्या पोलिसांनी व अंमली पदार्थ विरोधी पथकाने दिनांक २८ व २९ जुलै, २०२५ रोजी अनुक्रमे ४ कोटी आणि ३ कोटी ४ लाख रुपयांचा मेफेड्रोन साठा जप्त केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच साकीनाका (मुंबई) पोलीसांनी श्री.सादिक शेख या इसमाकडून ५३ ग्रॅम मेफेड्रोन साठा जप्त केला असता, त्यांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार वसईतील कामणगाव येथे ८ कोटी रुपयांचा मेफेड्रोनचा साठा सापडला असून बोरिवली, मालाड व सायन परिसरात अंमली पदार्थ विरोधी पथकाने दिनांक ३ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान केलेल्या कारवाईत रुपये ३ कोटी ५८ लाख किंमतीचे मेफेड्रोन जप्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अशा प्रकरणांत अटक झालेल्या बेकायदेशीर परदेशी नागरीकांची संख्या पाहता इमिग्रेशन व फॉरिनर्स कायद्यानुसार कारवाई आवश्यक असल्याने मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलिस आयुक्तालयाने डीटेंशन केंद्राची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह युवकांना धोका निर्माण करणारी वितरण नेटवर्क, ड्रग्सचे आंतरराष्ट्रीय स्रोत, उत्पादन स्थळे व परदेशी / आंतरराष्ट्रीय टोळ्यांविरुद्ध विशेष कृती योजना राबविण्याचे तसेच त्यांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक असलेल्या डिटेंशन केंद्र उभारणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) महेश अपार्टमेंट, एव्हरशाईन सिटी, मौ.गोखीवरे, वसई पुर्व येथे व्हिक्टर ओडीचीन्मा नामक नायजेरीयन व्यक्ती व त्याचा नायजेरीयन साथीदार यांच्या रुममध्ये २२ किलो ८६५ ग्रॅम वजनाचा रु.११,४३,२५,०००/- किंमतीचा मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ मिळून आल्याने त्यांच्या विरुद्ध वालीव पोलीस ठाणे, वसई पुर्व येथे गु.र.नं. २७९/२०२५ एनडीपीएस कायदा कलम ८(क),२१,२२,२९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जगन्नाथ अपार्टमेंट, नालासोपारा पुर्व येथे चिमा मॉसेस इबे या नायजेरीयन व्यक्तीकडे १०४० ग्रॅम वजनाचा रु.२,०८,००,०००/- किंमतीचा मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ मिळून आल्याने त्याच्या विरुद्ध तुळींज पोलीस ठाणे, नालासोपारा येथे गु.र.नं. ६६०/२०२५ एनडीपीएस कायदा कलम ८ (क),२१(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रगती नगर, नव्वद फिट रोड नालासोपारा येथे ऑर्जी चुकु मायकल या नायजेरीयन व्यक्तीकडे २१ ग्रॅम वजनाचा रु.१,०५,०००/- किंमतीचा मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ मिळून आल्याने त्याच्या विरुद्ध काशिगाव पोलीस ठाणे, नालासोपारा येथे गु.र.नं. २४०/२०२५ एनडीपीएस कायदा कलम ८ (क),२१(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) दि.२४.०७.२०२५ रोजी खारीगाव, टोल नाक्याजवळ एका व्यक्तीच्या कब्जात ६६२ ग्रॅम वजनाचे रु.९२,६८,०००/-किंमतीचे एमडी (मेफेड्रॉन) क्रिस्टल पावडर हा अंमली पदार्थ मिळून आल्याने त्याच्या विरुद्ध कळवा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.६५२/२०२५ एनडीपीएस कायदा कलम ८(क),२२(क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी न्यायालयीन कोठडीत असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) एका व्यक्तीच्या ताब्यात ५३ ग्रॅम वजनाचा अंदाजे रु. १०,०७,०००/- किंमतीचा मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीररित्या बाळगल्याने त्याच्या विरुद्ध साकीनाका पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२९६/२०२५, एनडीपीएस ॲक्ट कलम ८(क),२२(क) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या गुन्ह्यात ८ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्याच्या चौकशीत वसई कामणगाव येथे ४ किलो वजनाचे अंदाजे रु. ८ कोटी किंमतीचे एम.डी. हा अंमली पदार्थ मिळून आला आहे.

दि.०३.०९.२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक, कांदिवली युनिट यांनी केलेल्या कारवाईत एका व्यक्तीकडे १ किलो २९७ ग्रॅम वजनाचा रु.२,५९,४०,०००/- किंमतीचा मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ ताब्यात मिळून आल्याने त्याच्याविरुद्ध कांदिवली युनिट येथे गु.र.क्र. ७१/२०२५ एनडीपीएस ॲक्ट कलम ८(क), २२(क) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी सद्यस्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीत असून गुन्ह्याचा पुढील तपास सूरू आहे.

(५) असा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(६) राज्यात भोईवाडा मध्यवर्ती कारागृह, मुंबई येथे ८० विदेशी नागरिकांना स्थानबद्द करण्याच्या क्षमतेचे तात्पुरते स्थानबद्दता केंद्र स्थापन करण्याच्या अनुषंगाने दि.२५.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर स्थानबद्दता केंद्राचे काम अंतिम टप्यात आहे. तसेच राज्यात बाळेगाव, नवी मुंबई, जि.ठाणे येथे २१३ विदेशी नागरिकांना स्थानबद्द करण्याच्या क्षमतेचे कायमस्वरुपी स्थानबद्दता केंद्र स्थापन करण्याच्या अनुषंगाने दि.२५.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर स्थानबद्दता केंद्राचे काम प्रगतीपथावर आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**

**नागपूर.** **सचिव-१,**

**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.